cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४५ | सोमवार दि.४ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शिवसेनेला प्रहारची जोड रुचेल का?

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली आहे. पण बच्चू कडू यांच्या या निर्णयामुळे प्रहार जनशक्ती पक्षाचे काही कार्यकर्ते आणि पदाधिकारी नाराज झाल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे प्रहार जनशक्तीचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधले यांनी बच्चू कडू यांच्या शिवसेना प्रवेशावर नाराजी व्यक्त केली आहे.

# वाढत्या सोयाबीन दरावर व्यापाऱ्यांची कमाई; शेतकरी मात्र तोट्यातच

पुणे । प्रतिनिधी

**सध्या बाजारात सोयाबीनच्या दरात लक्षणीय वाढ होत असली तरी या दरवाढीचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. उलटपक्षी, साठवणूकदार व व्यापाऱ्यांनी कमी दरात खरेदी करून ठेवलेल्या मालामुळे त्यांनाच या तेजीचा सर्वाधिक फायदा होत असल्याची वस्तुस्थिती समोर येत आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सध्या सोयाबीनचे दर हमीभावाच्या पुढे गेले असून प्रति क्विंटल ५,७०० रुपयांपर्यंत**



**व्यवहार होत आहेत. काही ठिकाणी ५,००० ते ५,५०० रुपये दरम्यानही खरेदी–विक्री सुरू आहे.**

केंद्र शासनाने जाहीर केलेला हमीभाव ५,३२८ रुपये प्रति क्विंटल असताना, हंगामाच्या सुरुवातीला मात्र दर तब्बल ४,१०० रुपयांपर्यंत घसरले होते. या घसरणीमुळे आर्थिक अडचणीत असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांनी तातडीच्या गरजांसाठी आपला माल कमी दरात विक्री केला. विशेष म्हणजे, 'नाफेड'कडून खरेदी प्रक्रिया उशिरा सुरू झाल्याने शेतकऱ्यांना हमीभावाचा अपेक्षित आधार मिळू शकला नाही. परिणामी, बाजारात दर वाढल्यानंतरही बहुतांश शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी माल शिल्लक नसल्याने ते या तेजीपासून वंचित राहिले आहेत. यंदाच्या हंगामात अतिवृष्टीमुळे सोयाबीन उत्पादनावर मोठा परिणाम झाला. अनेक भागांत शेतात पाणी साचल्याने पिकांचे नुकसान झाले आणि एकूण उत्पादनात घट झाली. यामुळे बाजारातील आवक कमी झाली आहे. पुरवठा घट आणि मागणीत वाढ या मूलभूत अर्थशास्त्रीय कारणांमुळे सध्या दरवाढीस चालना मिळत आहे. त्याचबरोबर पशुखाद्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सोयापेंडच्या वाढत्या मागणीमुळेही बाजारात तेजी कायम असल्याचे जाणकार सांगतात. दरम्यान, कापूस बाजारातही सकारात्मक हालचाली दिसून येत आहेत. कापसाचे दर प्रति क्विंटल ८,५०० रुपयांचा टप्पा ओलांडून सध्या ८,२०० ते ८,४५० रुपयांच्या दरम्यान स्थिरावले आहेत. मर्यादित आवक आणि स्थिर मागणी यामुळे कापसाच्या ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मुरलीधर मोहोळ 'महाराष्ट्र ऑलिम्पिक' अध्यक्षपदी

पुणे : महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या(एमओए) रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर अखेर केंद्रीय नागरी विमानवाहू राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पुण्याच्या बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर हे पद काही काळ रिक्त होते.मागील वेळी अध्यक्षपदासाठी अजित पवार यांच्या विरोधात मुरलीधर मोहोळ यांनी शड्डू ठोकला होता. मात्र, ऐनवेळी दोन्ही नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि अजित पवार यांची अध्यक्षपदी तर मुरलीधर मोहोळ यांची उपाध्यक्षपदी वर्णी लागली होती. आता अजित पवारांच्या निधनानंतर मोहोळ यांनी या संघटनेची धुरा आपल्या हाती घेतली आहे.

### दिल्लीत एसीचा स्फोट ९ जणांचा होरपळून मृत्यू

नवी दिल्ली : येथील विवेक विहार भागात एका रहिवासी इमारतीत मध्यरात्री एसीचा स्फोट होऊन भीषण आग लागली. या आगीत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर, अनेकजण गंभीररीत्या भाजले आहेत. यातील अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांच्या संख्येत वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या आग आटोक्यात आणण्यात आली असून घटनास्थळी कुलिंग ऑपरेशन सुरू आहे.इमारतीच्या दुस–या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये मध्यरात्री एसीचा स्फोट झाल्याने आग लागली. आगीच्या ज्वाळा तिस–या मजल्यापर्यंत पोहोचताच, फ्लॅटमधील रहिवाशांनी स्वत:चा जीव वाचवण्यासाठी टेरेसच्या दिशेने धाव घेतली. परंतु, टेरेसचा दरवाजा आतून बंद असल्याने अनेकांचा मृत्यू झाला. दुस–या मजल्यावर उपस्थित असलेल्या चार व्यक्तींनाही या दुर्घटनेत आपला जीव गमवावा लागला. तर, एका पलंगावर तीन मृतदेह आढळून आले.

### ज्येष्ठ अभिनेते सुदेश कुमार यांचे निधन

मुंबई : मनोरंजन विश्वातून दु:खद बातमी समोर आली आहे. प्रसिद्ध अभिनेत्याचे निधन झाले आहे. ५०, ६० आणि ७० च्या दशकात चित्रपटसृष्टीला अनेक यशस्वी चित्रपट देणारे अभिनेते सुदेश कुमार यांचे निधन झाले आहे. सुदेश कुमार यांचे शुक्रवारी (१ मे) मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. वयाच्या ९५व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. चाहत्यांनी आणि मनोरंजन विश्वातील कलाकारांनी अभिनेत्याला श्रद्धांजली वाहिली आहे. 'पैसा' (१९५७) हा त्यांच्या सुरुवातीच्या चित्रपटांपैकी एक होता. त्यांचे खरे नाव सुदेश धवन असे होते.१९५९ मध्ये 'छोटी बहन' या चित्रपटातील छोट्या कॅमिओने त्यांना खूप लोकप्रियता मिळवून दिली. त्यांनी आपल्या कारकीर्दीत अनेक मोठ्या दिग्दर्शकांसोबत काम केले आहे.

# सत्ता कोणाची आज पाच राज्याचा निकाल

## दुपारपर्यंत निकाल;दीदींचा बंगाली गड ते स्टॅलिन, विजयनपर्यंत

नवीदिल्ली । वृत्तसंस्था

**देशातील राजकीय भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पाँडिचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल आज (४ मे) रोजी जाहीर होणार आहेत. दुपारपर्यंत सत्ता कोणाची हे स्पष्ट होईल बंगाल मध्ये भाजपने चांगलीच ताकद लावली होती त्यामुळे येथील निकालाकडे देशाचे लक्ष राहणार आहे.**



एप्रिल महिन्यात पार पडलेल्या या मतदानानंतर आता संपूर्ण देशाचे लक्ष उद्याच्या मतमोजणीकडे लागले आहे. प्रादेशिक अस्मिता, विकास आणि सत्तापालटाची लाट अशा विविध मुद्द्यांवर लढल्या गेल्या आहेत. सर्वाधिक लक्ष बंगालच्या निवडणुकीवर असेल. उद्या सकाळी ८ वाजेपासून मतमोजणीला सुरुवात होईल. दुपारी १२ वाजेपर्यंत बहुतांश राज्यांचे कल स्पष्ट होतील. या निकालांचा परिणाम आगामी राष्ट्रीय राजकारणावर आणि केंद्रातील सत्ता समीकरणांवरही पडण्याची शक्यता आहे. ममता बॅनर्जी, एम. के. स्टॅलिन आणि हिमंता बिस्वा सरमा यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या भविष्याचा फैसला उद्याच्या निकालांवर अवलंबून आहे.पश्चिम बंगालमध्ये सत्ता राखण्यासाठी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वस्व पणाला लावले आहे. यंदा या राज्यात दोन टप्प्यात (२३ आणि २९ एप्रिल) मतदान झाले. विशेष म्हणजे, मतदानाच्या टक्केवारीने जुने सर्व रेकॉर्ड मोडीत काढत ९२ टक्क्यांपर्यंत मजल मारली आहे.सध्या ममता बॅनर्जी मुख्यमंत्री असून तृणमूल काँग्रेसचीसत्ता आहे. भाजपने येथे मुख्य विरोधी पक्ष म्हणून तगडे आव्हान दिले आहे. २०२१मध्ये ने २१५ जागा जिंकल्या होत्या, तर भाजप ७७ जागांवर अडकला होता. यावेळी ही लढत अधिक चुरशीची मानली जात आहे.दक्षिण भारताचे महत्त्वाचे राज्य असलेल्या तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात ८४ टक्के मतदान झाले. येथे 'द्रविडी' राजकारणाची पाळेमुळे घट्ट असून यंदाही मुख्य लढत डीएमके ▶▶ पान २ वर

# दिल्लीत इमारतीला भीषण आग नऊ जणांचा होरपळून मृत्यू





दिल्ली । वृत्तसंस्था

**विवेक विहार भागातील एका चार मजली इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आज (३ मे) पहाटेच्या सुमारास लागलेल्या या भीषण आगीत आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर अन्य दोघे जण जखमी झाल्याचीही माहिती आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, आज (३ मे) पहाटे ४ वाजताच्या सुमारास इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर हि आग लागली, त्यानंतर आग विझवण्यासाठी आणि बचावकार्य करण्यासाठी अग्निशमन दलाच्या तब्बल १४ गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. मात्र आगीचे लोट पाहता तोपर्यंत आग इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यापर्यंत पसरल्याचे घटनास्थळी ▶▶ पान २ वर

# होऊ द्या जे व्हायचे ते केस झाल्याने फरक पडत नाही – मनोज जरांगे

बीड । प्रतिनिधी

**तालीक्यातील नेकनूरमध्ये गेल्या काही दिवसांपूर्वी दोन गटात दगडफेक आणि मोठा राडा झाला होता. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी त्यादिवशी महाराजांना फोन करून विचारलं होतं, यायचं आहे का? कधीही हाक मारा सगळ्यात आधी आम्ही उभे आहोत, आमच्यावर केस झाल्याने काही फरक पडणार नाही, होऊ द्या जे व्हायचे ते, मात्र ज्यांनी हे केलं त्या चार दोन लोकांसाठीच बाकीच्यांचा काही दोष नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी नेकनूरमधून दोन गटात झालेल्या राड्यानंतर सूचक वक्तव्य केले आहे.**



नेकनूर येथील बंकटस्वामी संस्थानच्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेसाठी मनोज जरांगे पाटील आले होते. त्यापुरवी नेकनूर ता बीड येथे गाडीचा धक्का लागल्याच्या कारणावरून दोन समाजात वाद झाला. यानंतर चालकासह रिक्षामध्ये असलेल्या महिलांना आणि छोट्या मुलाला मारहाण झाल्याची घटना घडली होती. यानंतर दोन गटात वाद झाला, अन्? पुढे काही वेळातच दगडफेक झाली. यानंतर मोठा राडा झाला. घटनेची माहिती समजताच पोलीसांचा मोठा ▶▶ पान २ वर

# पुणे बीड नंतर लातूरमध्ये संतापजनक घटना

लातूर । प्रतिनिधी

**पुणे नसरापूर आणि बीडनंतर आता लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातून अत्यंत अमानवी प्रकार उघडकीस आला आहे. बाप लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. जन्मदात्या पित्यानेच आपल्या अल्पवयीन मतिमंद मुलीवर अत्याचार केल्याची घटना समोर आल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.**

**मतिमंद असलेल्या मुलीवर अत्याचार**

महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून धक्कादायक आणि संतापजनक घटनांची मालिका सुरु आहे पुने जिल्ह्यातील बालिकेवरील अत्याचाराने राज्य हादरले असताना बीड जिल्ह्यात देखील अशीच घटना घडली यानंतर आज पुन्हा लातूर जिल्ह्यातील घटना समोर आली असून या प्रकरणात पीडित मुलीच्या आईने १७ एप्रिल रोजी जळकोट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अज्ञात व्यक्तीकडून मुलीवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, पीडित मुलगी सुमारे १९ आठवडे २ दिवसांची गर्भवती असल्याचे समोर आले होते, त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले. ▶▶ पान २ वर

# नेत्यांनी सांत्वनासाठी गावात येऊ नये

## चिमुकलीवरील अत्याचारानंतर गावकरी आक्रमक

पुणे । प्रतिनिधी

भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका चार वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अमानवीय अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. संतापलेल्या ग्रामस्थांनी न्याय नाही, तर भेट नाही असा पवित्रा घेतला आहे. जोपर्यंत नराधम आरोपीला फाशीची शिक्षा होत नाही, तोपर्यंत कोणत्याही राजकीय नेत्याला गावात प्रवेश दिला जाणार नाही, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. ▶▶ पान २ वर

# मुंबई–पुणे मिसिंग लिंकवर सेल्फी–काढला तर महागात पडणार

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' सुरू झाल्यानंतर काही प्रवासी सेल्फी आणि फोटो काढण्यासाठी वाहनं थांबवत असल्याचं समोर आलं आहे. मात्र हा प्रकार आता प्रवाशांना महागात पडणार असून महामार्ग पोलिसांनी यावर कठोर कारवाई सुरू केली आहे. मिसिंग लिंकवर फोटो किंवा सेल्फीसाठी थांबल्यास प्रवाशांना आर्थिक दंड लागू शकतो, तसेच त्यांच्यावर गुन्हाही दाखल होऊ शकतो. असं महामार्ग पोलिसांनी म्हटले आहे.

मिसिंग लिंकवर वाहनं १०० ते १२० किमी प्रतितास वेगाने धावत असतात. ▶▶ पान २ वर

# बच्चू कडू म्हणाले मी खुश पण बायको नाराज

मुंबई । प्रतिनिधी

**एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली ही निवडणूक बिनविरोध झाली असून बच्चू कडू यांची आमदार झाले केवळ औपचारिकता राहिली बाकी आहे.ते आमदारकी मिळाल्याने खुश आहेत पण आता ते आपल्याला वेळ देणार नाहीत म्हणून त्यांची पत्नी मात्र नाराज आहेत हे दुसरे तिसरे कोणी नाही खुद्द बच्चू कडू यांनीच माध्यमांना एका मुलाखतीत सांगितले.**



या दरम्यान बच्चू कडू म्हणाले, पराभव झाल्यामुळे माझ्या पत्नीला वाटले, की आता पाच वर्षे कटकट नाही. मीदेखील आंदोलन आणि शेतीच्या कामाला लागलो. मी अलीकडेच केळीची लागवड केली आणि गायीचे दूध काढणे शिकत होतो; मात्र अचानक टीव्हीवरील बातम्या पाहून माझी पत्नी अस्वस्थ झाली.कडू यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांना विधान परिषदेची उमेदवारी जाहीर झाली. त्यामुळे त्यांना मंत्रिपद मिळणार असल्याची चर्चा आहे. त्यावर बोलताना ते म्हणाले, मी स्वत:साठी काहीच मागितले नाही आणि पुढेही मागणार नाही. दिवंगत आर. आर. पाटील यांनीदेखील मला राज्यमंत्रिपदाची ऑफर दिली होती; मात्र मी स्वीकारली नाही. मंत्रिपद मिळो वा न मिळो, मी माझ्या कामाला सुरुवात केली आहे. विधान परिषदेच्या सभागृहात वंचित, शेतकरी आणि ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.२९ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३९.०० क्विंटल | २,२५१ | २,५९१ | २,३३६ |
| ज्वारी/हायब्रिड: १२४.५० क्विंटल | १,७५० | ३,९०० | २,४७१ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८.५० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १०३.०० क्विंटल | २,००० | २,४०० | २,२६४ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ५,०७६ | ५,१५७ | ५,११६ |

# बंगालचा निकाल लागताच भाजप संघटनेत फेरबदल?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल उद्या, सोमवारी (दि. ४) जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षामध्ये राष्ट्रीय स्तरावरील संघटनात्मक बदलांपासून ते राज्य सरकारांतील फेरबदलांपर्यंत अनेक मोठे निर्णय होण्याची प्रक्रिया वेगवान होण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. पक्षसूत्रांच्या माहितीनुसार, मे महिना हा भाजप पक्षसंघटनेच्या अनेक प्रलंबित निर्णयांना अंतिम रूप देणारा ठरू शकतो. महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्याला धार देण्यासाठी भाजप पक्षसंघटनेपासून अन्यत्र महिलांना जास्तीत जास्त संधी देण्याचे धोरण पक्षनेतृत्व अंमलात आणू शकते.**



विधानसभांच्या निवडणूक निकालानंतर भाजपमध्ये संघटनात्मक पुनर्रचना, नेतृत्वाचा समतोल आणि महिलांना वाढते प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर आधारित महत्त्वाचे निर्णय दिल्लीच्या पातळीवरून वेगाने घेतले जाण्याची प्रक्रिया व त्यातील महिलांच्या सहभागाचा मुद्दा या घडामोडींचा केंद्रबिंदू ठरणार आहे.नितीन नवीन यांची पक्षाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतही याच महिन्यात फेरबदल होण्याची शक्यता आहे. नवीन यांच्या नव्या संघात अनुभवी आणि युवा नेतृत्वाचा समतोल राखण्यावर भर दिला जाणार असल्याचे संकेत आहेत. त्यातही महिलांना अधिक प्राधान्य देण्याची भूमिका घेताना नवीन यांच्या संघातही ३३ टक्क्यांहून अधिक पदे महिलांना दिली जाण्याची दाट शक्यता आहे. यामुळे पक्षाच्या संघटनात्मक रचनेतही महिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीयरीत्या वाढणार आहे.पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये निवडणुका असलेल्या उत्तर प्रदेशमध्ये राजकीय हालचाली वेगाने सुरू झालेल्या असताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या विस्ताराची तयारी पूर्ण झाल्याचे सांगितले जाते. जेमतेम १० महिन्यांवर आलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विस्तार महत्त्वाचा मानला जात आहे. यामध्ये योगी मंत्रिमंडळातील रिक्त पदे भरण्यासह काही विद्यमान मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.बिहारमध्येही सरकार विस्तार अपेक्षित आहे. नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपद सोडून राज्यसभा सदस्यत्व स्वीकारल्यावर नवे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात विस्ताराला ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# शिवसेनेला प्रहारची जोड रुचेल का?

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली आहे. पण बच्चू कडू यांच्या या निर्णयामुळे प्रहार जनशक्ती पक्षाचे काही कार्यकर्ते आणि पदाधिकारी नाराज झाल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे प्रहार जनशक्तीचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधले यांनी बच्चू कडू यांच्या शिवसेना प्रवेशावर नाराजी व्यक्त केली आहे. बच्चू कडू यांच्या शिवसेना प्रवेशाच्या निर्णयावर अनेकांकडून टीका देखील होत आहे. काही जणांकडून बच्चू कडू यांना सोशल मीडियावर ट्रोलही केलं जात आहे. या सर्व ट्रोलर्स आणि टीका करणाऱ्यांना बच्चू कडू यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. आपण शिवसेनेत प्रवेश करण्याचा का निर्णय घेतला? याबाबत बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं आहे.

''ज्यांना राजकीय काम करायचं ते शिवसेनेत येतील. मात्र काही नालायक असतात ते सुटत नाही. ज्यांना व्यवस्थित राहायचे त्यांनी राहावं. मी कोणाला जबरदस्ती केली नाही. आमच्या राजकीय प्रवासाला सुरुवात शिवसेनेतून झाला. नंतर प्रहारमधून होता. मोठमोठे लोक पक्ष सोडून गेले. पक्ष बदलला. बच्चू कडू १५ वर्षे एकटा लढला. पाच ते सहा निवडणुका लढलो. एकाही पक्षाचा पाठिंबा घेतला नाही. ३०० गुन्हे दाखल करून घेणारा बच्चू कडू शिवाय दुसरा महाराष्ट्रात कोणी सापडणार नाही'', असं बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं.

''राष्ट्रवादी राष्ट्रवादीत विलीनीकरण झालं. भर महानगरपालिकेत मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे सोबत गेले. काँग्रेस, शिवसेना एकमेकांसोबत बसली. त्यांच्यावर टीका होत नाही. टीका करण्यासाठी बच्चू कडू आहे'', अशी खंत त्यांनी व्यक्त केली.''राजकीय परिस्थिती सध्या जात आणि धर्माची झाली आहे. मुद्दे संपले आहेत. म्हणून आम्ही टिकू तर शेतकऱ्यांचा आणि दिव्यांगांचा मुद्दा टिकेल म्हणून हा निर्णय घेतला'', असंदेखील बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं.''शिवसेनेचे धोरण शेतकऱ्यांचे आहे आणि अजून शेतकऱ्यांसाठी नवीन धोरण तयार करेन. पुन्हा शिवसेना शेतकऱ्यांच्या बाजूने सक्षमपणे उभी राहील. त्यामुळे कोणाची पोटदुखी होत असेल तर आम्ही परवा करत नाही. मी आत्मविश्वासाने चालणार आहे'', अशी भूमिका बच्चू कडू यांनी मांडली.''ट्रोल करणारे ५० पैशाला विकत भेटतात. त्याची आम्ही परवा करत नाही. सर्व पक्षातील केबिन अर्धी याच लोकांनी भरली आहे. ट्रोल करणारे सर्व विकाऊ आहेत. ट्रोल करणाऱ्याचे माय आणि बाप दहाजन आहेत. प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज यांना देखील नाव ठेवलं. मी तर एक छोटा माणूस आहे. हौसे, नवसे, गौसे याला बच्चू कडू घाबरणारा नाही'', असं सांगत बच्चू कडू यांनी आपला निर्धार स्पष्ट केला.''बच्चू कडूवर विश्वास ठेवून बच्चू कडूच्या आत्मविश्वासावर मजबूत राहा. अशा पाखंडी लोकांवर काही चर्चा करू नका. कर्जमाफीची घोषणा करून घेणारा बच्चू कडू व्यतिरिक्त कोणी मायकालाल मैदानात होता का?'', असा सवाल बच्चू कडू यांनी केला. ''शेतकरी कर्जमाफीचा जीआर १५ ते २० दिवसात निघणार. त्यानंतर हातातील बंधन सुटणार. अधिवेशनात घोषणा झाल्यावर शेतकरी सोडून कोणी आमचा सत्कार किंवा आभार मानले आहेत का?'', असादेखील सवाल त्यांनी केला.''आता शिवसेनेचा नवा चेहरा पाहायला मिळेल. हा चेहारा शेतकरी आणि दिव्यांगासाठी लढणारा असेल. हातात घेतलेला भगवा हा छत्रपती शिवरायांच्या विचारांचा आहे. त्या विचाराने महाराष्ट्र पिंजून काढत शिवसेनेची ताकद वाढवून शेतकरी आणि दिव्यांगांच्या बाजूने उभी करू. शेवटच्या श्वासापर्यंत शेतकरी, कामगार आणि दिव्यांग सुटणार नाहीत. काही पण सुटलं तरी चालेल. मात्र शेतकरी आणि दिव्यांगांपासून आम्ही अलिप्त राहणार नाही'', असं बच्चू कडू म्हणाले.पण त्यांना अनेकांनी ट्रॉल केलं आता प्रहार शिवसेना सहन करेल का किंवा कडू सेनेचा अन विरोधकांचा प्रहार सहन करतील का हे पहावे लागेल

# साक्षगंध सोहळ्यात 'पुस्तकरूपी' प्रबोधन

## 'शिवाजी कोण होता' ग्रंथाची भेट देऊन जोपासली सामाजिक बांधिलकी

**अमरावती । प्रतिनिधी**

**कौटुंबिक सोहळ्यांच्या माध्यमातून सामाजिक क्रांती आणि वैचारिक प्रबोधनाची पेरणी कशी करता येते, याचे एक आदर्श आणि प्रेरक उदाहरण पुलगाव येथे पाहायला मिळाले. साक्षगंधासारख्या मंगल प्रसंगी अवाजवी खर्चाला फाटा देऊन, उपस्थित पाहुण्यांना ज्ञानाची शिदोरी देण्याचा एक स्तुत्य उपक्रम येथे राबविण्यात आला.**



चांदूर रेल्वे येथील प्रतिष्ठित नागरिक व ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड अँड. शिवाजी देशमुख यांनी त्यांचे चिरंजीव क्षितिज आणि कोमल यांच्या साक्षगंधाच्या (वाग्दत्त) निमित्ताने उपस्थित स्नेह्यांना दिवंगत विचारवंत कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता' या जगप्रसिद्ध आणि ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथाच्या प्रती भेट म्हणून देऊन सामाजिक उत्तरदायित्व जोपासले. सध्याच्या काळात लग्न असो वा साक्षगंध, यांसारख्या कौटुंबिक समारंभांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक उधळपट्टी केली जाते. अशा सोहळ्यांमध्ये पाहुण्यांना मिठाई किंवा शोभेच्या वस्तू देण्याची सर्वसाधारण पद्धत आहे. मात्र, समाजात वैचारिक प्रबोधन व्हावे आणि विशेषतः तरुण पिढीसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा, लोककल्याणकारी व न्यायप्रिय इतिहास जावा, या उद्देशाने देशमुख परिवाराने 'पुस्तकरूपी' भेटीचा हा क्रांतिकारी निर्णय घेतला. कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून शिवरायांचे प्रशासन, त्यांचे रयतेबद्दलचे प्रेम, स्त्रियांबद्दलचा आदर आणि अठरापगड जाती-धर्माच्या लोकांना स्वराज्याच्या एका सूत्रात गुंफण्याचे त्यांचे महान कार्य अतिशय प्रभावीपणे आणि अधिकृत संदर्भांसह मांडले आहे. महाराजांच्या इतिहासातील 'शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका' हा रयतेचा विचार घराघरांत पोहोचावा, हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू होता. या सोहळ्याला सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि कायदेशीर क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. साक्षगंधाच्या पवित्र प्रसंगी हातात वैचारिक पुस्तक मिळाल्याने उपस्थितांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत समाधान व्यक्त केले. ''केवळ समारंभ साजरा न करता, येणाऱ्या पाहुण्यांना एक प्रगल्भ विचार देऊन निरोप देणे, ही आजच्या काळाची मोठी गरज आहे,'' अशा शब्दांत उपस्थितांनी देशमुख कुटुंबाच्या या कृतीचे कौतुक केले. आपल्या घरातील आनंदाच्या क्षणी सामाजिक बांधिलकीचे भान कसे राखावे, याचे उत्तम उदाहरण कॉम्रेड अँड. शिवाजी देशमुख आणि त्यांच्या कुटुंबियांनी समाजासमोर ठेवले आहे. या विशेष उपक्रमाची चर्चा सध्या संपूर्ण जिल्ह्यात होत असून, इतर कुटुंबांसाठी हा उपक्रम केवळ प्रेरणादायीच नव्हे, तर दिशादर्शक ठरणार आहे. या सोहळ्यातून नात्यांच्या रेशीमगाठींसोबतच समृद्ध वैचारिक वारशाची गाठही घट्ट बांधली गेली.

# वृद्धत्वातील विस्मरण टाळायचेय?- डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**वाढत्या वयानुसार मेंदूची कार्यक्षमता टिकवून ठेवणे आणि विस्मरणासारखे आजार (डिमेंशिया) टाळणे आता आपल्या हातात आहे. अल्झायमर्स असोसिएशनने तुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात मेंदूच्या १० महत्त्वाचे बदल सुचवले आहेत. मेंदूसाठी ही सवय म्हणजे एका बचत खात्या सारखी आहे, ज्याचा फायदा भविष्यात होतो.**



१. मेंदूला आव्हाने द्या: दररोज काहीतरी नवीन शिका. नवीन भाषा, एखादे कठीण कौशल्य किंवा बुद्धिबळासारखे धोरणात्मक खेळ खेळल्याने मेंदू सक्रिय राहतो.ॉ २. शिकत राहा : शिक्षणामुळे स्मृतिभ्रंशाचा धोका कमी होतो. स्थानिक वाचनालयात जा, एखादा ऑनलाईन क्लास लावा किंवा नवीन विषयावर वाचन करा. ३. नियमित व्यायाम : आठवड्यातून किमान ४ वेळा ३० ते ३५ मिनिटे वेगाने चालणे, धावणे किंवा डान्स करणे यासारखे व्यायाम करा. यामुळे मेंदूला होणारा रक्तपुरवठा सुधारतो. ४. डोक्याची सुरक्षा : सायकल चालवताना किंवा खेळ खेळताना हेल्मेट वापरा आणि प्रवासात सीटबेल्ट लावा. डोक्याला लागलेली गंभीर दुखापत भविष्यात मेंदूच्या आरोग्यावर परिणाम करू शकते. ५. धूम्रपान सोडा : धूम्रपान सोडल्यास काही काळानंतर विस्मरणाचा धोका, कधीही धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींइतकाच कमी होतो. ६. रक्तदाब नियंत्रित ठेवा : उच्च रक्तदाबाचा थेट परिणाम मेंदूच्या नसांवर होतो. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने रक्तदाब नेहमी सामान्य मर्यादेत ठेवा. ७. मधुमेहाचे व्यवस्थापन : टाईप-२ मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी योग्य आहार आणि औषधोपचार घ्या. ८. पौष्टिक आहार : आहारात हिरव्या पालेभाज्या, कमी चरबीयुक्त प्रथिने आणि कमीत कमी प्रक्रिया केलेले ( ) पदार्थ यांचा समावेश करा. ९. वजनावर नियंत्रण : लठ्ठपणामुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवतात, ज्यांचा परिणाम मेंदूवर होतो. त्यामुळे निरोगी वजन राखण्याचा प्रयत्न करा. १०. पुरेशी झोप : दिवसाला किमान ७ तासांची शांत झोप घ्या. झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा टी.व्ही.चा वापर टाळा , जेणेकरून मेंदूला पूर्ण विश्रांती मिळेल. अल्झायमर्स असोसिएशनच्या अहवालानुसार, तिशीपासून ते साठीपर्यंत आपण आपल्या मेंदूला जेवढे जास्त सक्रिय ठेवू, तेवढा जास्त मानसिक साठा तयार होतो. भविष्यात जर मेंदूला काही आजार झाला, तर हा साठा तो आजार रोखण्यासाठी किंवा त्याचे परिणाम कमीङ्गङ्गकरण्यासाठी मदत करतो. त्यामुळे मेंदूच्या आरोग्यासाठी गुंतवणूक करायला कधीही उशीर झालेला नसतो, आजपासूनच सुरुवात करा. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.



बीड: पांडुरंग भस्मारे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना गिरीश देशपांडे, दत्तात्रय दुधाळ, सतीश बहीर, बाळकृष्ण शेनकुडे, वसंत नहिराळे, दत्तात्रय डाके, हनुमान धावडे, अमोल धोंगडे, सुभाष सोनवणे, अशोक टल्ले आदि.

# कृषी प्रदर्शनाला तिसऱ्या दिवशीही अलोट गर्दी ; आज पुरस्कार वितरण समारंभ

## कुलगुरू इंद्रमणी, ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते होणार वितरण

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथे सुरु असलेल्या पाच दिवशीय कृषी प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशीही नागरिकांनी कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी अलोट गर्दी पाहायला मिळाली दिनांक ५ मे मंगळवार पर्यंत हे प्रदर्शन चालू राहणार आहे कृषी प्रदर्शनात प्रामुख्याने कृषी क्षेत्रातली विविध स्टॉल आकर्षण ठरत आहे.**

किसान कृषी प्रतिष्ठाणच्या वतीने गेवराई येथे मागील १८वर्षापासून कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी प्रथमच बीड येथे खरीप हंगामाच्या तोंडावर प्रदर्शन आयोजित केले आहे या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरतील असे अनेक कंपन्यांचे स्टॉल ला गले आहेत. या स्टॉलवर तज्ञांमार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते आज दिनांक ४ मे रोजी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ११ शेतकऱ्यांना किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने किसान कृषिरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येते या कार्यक्रमास मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी चे कुलगुरू डॉक्टर इंद्रमनी , शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे, आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा साय. ६ वाजता पार पडणार आहे . या प्रदर्शनात आधुनिक तंत्रज्ञान, कृषी क्षेत्रातील नवीन विचार या बरोबरच खाद्य पदार्थांचे देखील स्टॉल आहेत. या स्टॉलवर अल्पोपहार तसेच वडापाव, कचोरी, समोसा, अपे, पाणीपुरी, रगडा, डोसा, उथप्पा मिळत असून याठिकाणी खवय्ये मोठी गर्दी करत असल्याचे एकंदरीत चित्र आहे गेल्या १८ वर्षापासून किसान कृषी विकास प्रतिष्ठान शासनाच्या कसलाही अनुदान न घेता हे प्रदर्शन स्वखर्चतून व कंपन्यांच्या प्रायोजक सहकार्यातून हे प्रदर्शन करते वाढलेली महागाई प्रचंड खर्च असतानाही संस्था स्वतःच्या कल्पकतेचा वापर करून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने या कृषी प्रदर्शनात नव आधुनिक तंत्रज्ञान देण्याचा प्रयत्न करते त्याचबरोबर मराठवाड्यातील मी काही कार्य शेतीमध्ये केले आहे अशा शेतकऱ्यांनाही दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मानित करते ही बाब महत्त्वाची आहे.



# पालकमंत्री यांच्या हस्ते मोतीबाग चौपाटी सुशोभीकरणाच्या कामाचे लोकार्पण


**जालना । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते जालना शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या नवीन चौपाटीचे सुशोभीकरणाच्या कामाचे लोकार्पण करण्यात आले. याठिकाणी नागरिकांसाठी विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल्स आणि बैठकीची उत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.



यावेळी महापौर श्रीमती वंदना मगरे, खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कंवरिया, मनपा आयुक्त अंजली शर्मा, रमेश मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण



**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र दिनाच्या ६७ वा स्थापना दिनानिमित्त जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, प्र. निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, श्रीमती पगारे, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### वाढत्या सोयाबीन दरांवर व्यापाऱ्यांची

दरातही सध्या स्थैर्य राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकूणच, सोयाबीन आणि कापूस या दोन्ही पिकांच्या दरात सुधारणा होत असली तरी शेतकऱ्यांच्या हाती माल शिल्लक नसल्याने या वाढीचा थेट फायदा त्यांना होत नाही. यामुळे बाजारातील तेजीचा खरा लाभ कोणाला मिळतो आहे, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भविष्यात अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना योग्य वेळी हमीभाव व साठवणुकीची सुविधा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

----------------

### दिल्लीत इमारतीला भीषण

पोहोचल्यावर अधिकाऱ्यांना आढळून आले.दरम्यान, इमारतीतून डझनहून अधिक लोकांना वाचवण्यात यश आल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलीय. सध्या जखमींना उपचारासाठी गुरुतेग बहादूर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन तासांनंतर, सकाळी ६ वाजेपर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. सध्या इमारतीचे अनेक भाग जळालेले आणि सर्वात वरच्या मजल्यावरून धूर बाहेर येताना दिसत आहे. पहाटे सुमारे ४ वाजता आग लागल्याचा फोन आला. अग्निशमन दलाच्या गाड्या आणि स्थानिक पोलिसांना तात्काळ घटनास्थळी पाठवण्यात आले. आग नियंत्रणात आणायला सुमारे दोन तास लागले, त्यानंतर शोधमोहीम राबवण्यात आली,'' अशी माहिती शाहदराचे डीसीपी राजेंद्र प्रसाद मीना यांनी दिली आहे.

-----------

### सत्ता कोणाची आज पाच

आणि अण्णाद्रमुक यांच्यातच पाहायला मिळाली.सद्यस्थिती: मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली सत्ता राखण्याचा प्रयत्न करत आहे. २०२१ मध्ये १३३ जागांसह डीएमके सत्तेत आले होते, तर अण्णा द्रमुक ६६ जागांसह विरोधी पक्षात आहे.केरळमध्येमुख्यमंत्री पिनराई विजयन यांना काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफने आव्हान दिलं आहे. बहुमताचा आकडा: एकूण १४० जागा असून बहुमतासाठी ७१ जागांची गरज आहे.सद्यस्थिती: सध्या एलडीएफ आघाडीचे सरकार असून पिनराई विजयन मुख्यमंत्री आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ ही आघाडी येथे प्रबळ विरोधी पक्ष आहे. गेल्या वेळी डाव्यांनी ९९ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते.ईशान्य भारतातील प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या आसाममध्ये ९ एप्रिलला ८० टक्के मतदान झाले. नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्सआणि नागरिकत्व दुरुस्ती कायदायांसारख्या मुद्द्यांमुळे येथील निवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.१२६ जागांच्या विधानसभेत ६४ जागांवर बहुमताचा आकडा आहे. सद्यस्थिती: हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजप सत्तेत आहे. त्यांच्यासमोर काँग्रेसने महाआघाडी करून मोठे आव्हान उभे केले आहे. गेल्या वेळी भाजपने ६० जागांसह सत्तेची सूत्रे हाती घेतली होती.या केंद्रशासित प्रदेशात ३० जागांसाठी ९ एप्रिलला ८१ टक्के मतदान झाले. येथे एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखालील भाजपची युती सत्तेत आहे.बहुमताचा आकडा: ३० निर्वाचित जागांपैकी १६ जागा बहुमतासाठी आवश्यक आहेत.सद्यस्थिती: मुख्यमंत्री एन. रंगास्वामी पुन्हा एकदा सत्तेत येण्यासाठी प्रयत्नशील आहेत, तर काँग्रेस आणि डीएमके आघाडीने त्यांना जोरदार टक्कर दिली आहे.

---------------

### पुणे बीड नंतर लातूरमध्ये

तक्रारीनंतर जळकोट पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयाच्या आधारे मुलीच्या वडिलांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. पोलिसी चौकशीत संबंधित आरोपी वडिलांनीच हे कृत्य केल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे.या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९९/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

----------

### होऊ द्या जे व्हायचे ते केस झाल्यान

फौजफाटा रस्त्यावर उतरला आणि दोन्ही बाजूच्या लोकांना पोलिसांकडून पांगवण्यात आले. दरम्यान गेल्या काही दिवसांपूर्वी देखील अशाच प्रकारचा वाद झाला होता. त्यानंतर आता पुन्हा वाद झाल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. एकंदरीत या प्रकरणावर भाष्य करत मनोज जरांगे पाटील यांनी या विषयावर भाष्य केलं आहे.रिक्षा चालकाचा कट लागल्याने दुचाकी स्वार आणि रिक्षा चालक या दोघांच्या वादातून दोन गट आपापसात भिडले. दरम्यान या घटनेचे काही सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून या अनुषंगाने बीड पोलीस शांतता भंग करणाऱ्या विरोधात कारवाई केली आहे. नेकनूर प्रकरणात पोलिसांनी ३० जणां विरोधात गुन्हा दाखल केला असून ११ जण ताब्यात घेतले आहे.

--------------

### मुंबई-पुणे मिसिंग लिंकवर सेल्फी-

अशा परिस्थितीत मध्येच थांबून फोटो काढणं हे अत्यंत धोकादायक ठरत आहे. त्यामुळेच पोलिसांनी अशा प्रकारांवर बंदी घालत दंडात्मक कारवाईला सुरुवात केली आहे.मिसिंग लिंक हा प्रकल्प विशेषतः घाटातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी उभारण्यात आला आहे. अशा ठिकाणी वाहन थांबवणं म्हणजे स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणं ठरत आहे. महामार्ग पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे मिसिंग लिंकवर थांबून सेल्फी किंवा फोटो काढणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल केला जाईल.पोलिसांकडून केवळ दंडच नव्हे तर गंभीर प्रकरणांमध्ये गुन्हेही नोंदवले जाणार आहेत. सकाळपासून अशा घटनांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. कारवाई टाळायची असेल तर मिसिंग लिंकवर कुठेही न थांबता प्रवास करा, असं आवाहन महामार्ग पोलिसांनी केलं आहे.दरम्यान, भाजपचे नेते केशव उपाध्ये यांनीही मिसिंग लिंकवर फोटो काढल्याची चर्चा रंगली आहे. सोशल मीडियावर त्यांनी पोस्ट शेअर करत प्रकल्पाचं कौतुक केलं, मात्र यावरून वाहतूक नियमांच्या पालनाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

----------

### नेत्यांनी सांत्वनासाठी

काही दिवसांपूर्वी नसरापूर परिसरात एका ६५ वर्षीय नराधमाने चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या केली होती. या घटनेनंतर परिसरात कमालीची शांतता आणि संताप पसरला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असली, तरी हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला तात्काळ फाशी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.घटनेचे गांभीर्य पाहून अनेक राजकीय नेते सांत्वनासाठी गावात येण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, ''आम्हाला आता केवळ सांत्वन नको, तर कृती हवी आहे,'' असे म्हणत ग्रामस्थांनी गावाच्या वेशीवरच फलक लावले आहेत. ''जोपर्यंत आमच्या लेकीला न्याय मिळत नाही, तोपर्यंत कोणीही राजकारण करण्यासाठी गावात येऊ नये,'' अशा भावना स्थानिक महिलांनी व्यक्त केल्या आहेत.प्रशासनाने या प्रकरणाचा तपास लवकरात लवकर पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल करावे, अशी विनंती ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

---------

### बच्चू कडू म्हणाले मी

दिव्यांगांच्या समस्या मांडणार आणि त्यांना न्याय मिळवून देणार आहे.असे म्हणाले त्यासोबतच त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याने समाजमाध्यमांवर त्यांना ट्रॉल करण्यात येते यावर देखील भाष्य केले .

----------

### बंगालचा निकाल लागताच

गती देणे केंद्रीय नेतृत्वाला भाग आहे. भाजप आणि जदयू यांच्यातील सत्तावाटप सूत्रानुसार दोन्ही पक्षांना समान प्रतिनिधित्व दिले जाऊ शकते. प्रत्येक पक्षाकडे १६-१६ मंत्रीपदे असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या मुख्यमंत्र्यांकडे असलेली काही खाती भाजप कोट्यातील मंत्र्यांना दिली जाऊ शकतात, तर उपमुख्यमंत्र्यांकडील विभाग जदयूच्या कोट्यातील मंत्र्यांना दिले जाण्याची शक्यता आहे. नितीशकुमार यांच्या इच्छेनुसार निशांतकुमार यांना बिहारचे उपमुख्यमंत्रिपद मिळणे अपेक्षित आहे.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ०४ मे २०२६


## थोडक्यात

### महाराष्ट्र दिनी रिया ओव्हाळचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

शहरातील प्रकाश आंबेडकर नगरामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या वकृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल महाराष्ट्र दिनी शाळेच्या वतीने रिया उत्तमराव ओव्हाळ हिचा सत्कार करण्यात आला.



बार्शी नाका परिसरातील प्रकाश आंबेडकर नगरामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत वकृत्व स्पर्धा लक्षवेधी ठरली असून या स्पर्धेत रिया उत्तमराव ओव्हाळ हिने प्रथम पारितोषिक पटकावले होते तिच्या या यशाबद्दल अशोक नगर जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेत महाराष्ट्र दिनी सकाळी रिया उत्तम ओव्हाळ हिचा सत्कार करण्यात आला यापूर्वी शाळेत ध्वजारोहण करण्यात आले या कार्यक्रमाला मुख्याध्यापक सुनील कुरलेकर, अब्दुल नियाजी, मुख्याध्यापक हाकी मणियार, केंद्रप्रमुख सय्यद मुखीद जाफर, आचार्य सर, मंगल चव्हाण, तेलंगण माया, लता काकडे, मनीषा फुंदे, सय्यद मुमताज, नंदाबाई कागदे, शिवकन्या सोनवणे, उषा कुलथे, शारदा मिटकरी, शोभा कदम, वीर विलास, जायभाये विठ्ठल, सखाराम शिंदे, संजय दराडे, संगीता वाघमारे सह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### देवडीत 'लाल बावटा' संघटनेकडून आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा

वडवणी । प्रतिनिधी

१ मे रोजी देवडी येथील लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने बांधकाम आणि ऊसतोड कामगारांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये आरोग्य शिबिर आणि साहित्य वाटपासारखे समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्य सचिव कॉ. ओम पुरी होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ऊसतोड कामगार नेते कॉ. सय्यद रज्जाक उपस्थित होते. कामगार चळवळीची गाथा: कॉ. सय्यद रज्जाक यांनी 'सीटू' संघटनेचा संघर्ष आणि कामगार चळवळीचा गौरवशाली इतिहास मांडला. तसेच ऊसतोड कामगारांनी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी 'लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार मंडळा'कडे नोंदणी करण्याचे आवाहन केले. कायद्यांची माहिती: कॉ. ओम पुरी यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील कामगारांचे योगदान अधोरेखित केले. सध्या




लागू झालेल्या चार नवीन कामगार कायद्यांबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन करत, असंघटित कामगारांनी आपल्या हक्कासाठी एकजूट होऊन संघटना बळकट करण्याची गरज व्यक्त केली. केवळ भाषणेच नव्हे, तर कामगारांच्या कल्याणासाठी प्रत्यक्ष कृतीवर या कार्यक्रमात भर देण्यात आला: आरोग्य तपासणी: डॉ. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामगारांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

साहित्य वाटप: उपस्थित कामगारांना कॉ. रज्जाक व कॉ. ओम पुरी यांच्या हस्ते 'भांडी संचाचे' वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांच्या स्नेहभोजनाने झाली.

येणाऱ्या काळात ग्रामीण भागातील असंघटित कामगारांनी एकजुटीने आणि ताकदीने चळवळ वाढवणे हीच काळाची गरज आहे.

– कॉ. ओम पुरी (राज्य सचिव, लाल बावटा संघटना)

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी कॉ. पप्पू आजबे, अन्सार शेख, अनिकेत झाटे, हरिदास गिरी, अविनाश लोंढे आणि आप्पा सिंग चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील शेकडो कामगार या कार्यक्रमाला उपस्थित होते, ज्यामुळे देवडी परिसरात कामगार दिनाचा उत्साह ओसंडून वाहत होता.

# येळा तांड्याच्या सर्वच पाईपलाईन तोडफोड केल्यामुळे बंजारा समाजाचे तहसीलसमोर चौथ्या दिवशीही उपोषण सुरूच

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील ईरला मजरा येथील काही शेतकऱ्यांनी बंजारा समाजाच्या पाईपलाईन तोडल्यामुळे सुरू करण्यात आलेले माजलगाव तहसील कार्यालय समोरील आमरण उपोषण प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या दुर्लक्षामुळे चौथ्या दिवशीही सुरूच आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.



उपोषणकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, ईरला येथील गावकऱ्यांनी गट क्रमांक १६, १७ आणि २१ मध्ये मुद्दाम चर खोदून ०४ एप्रिल २०२६ रोजी बंजारा समाजाच्या तीन ठिकाणांवरील एकूण १३ पाईपलाईन तोडलेल्या आहेत. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून पिण्याचे व जनावरासाठी आणि शेतीसाठी होणारा पाणीपुरवठा खंडित झाला आहे. संबंधित पाईपलाईन तात्काळ पूर्ववत जोडून देऊन झालेला अन्याय दूर करावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

तसेच परिसरातील जळालेल्या पिकांचा तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशीही प्रमुख मागणी आंदोलकांनी प्रशासनाकडे केली आहे. अनेक दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर बेमुदत आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलकांनी सांगितले. प्रशासनाने आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून प्रश्न सोडवावा, अशी मागणी उपोषणकर्त्या शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## जगाला युद्धाची नाही, तर बुद्धाची गरज - प्रा.लक्ष्मण मस्के

माजलगाव । प्रतिनिधी

येथील यशोधरा बुद्ध विहार, फुले नगर येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी धम्ममित्र लक्ष्मण सहराव यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाच्या ध्वजारोहणाने झाली. या प्रसंगी राहुल कुमार टाकणखार, अशोक कांबळे, सुधाकर बापू उजगरे यांच्यासह परिसरातील बौद्ध उपासक-उपासिका व बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य व्याख्याते प्रा. एल. आर. मस्के सर यांनी आपल्या मार्गदर्शनात 'जगाला आज युद्धाची नाही, तर बुद्धाची गरज आहे' असे ठाम प्रतिपादन केले. त्यांनी सम्राट अशोकांनी बांधलेली ८४,००० बुद्ध विहारे आणि भारताची जागतिक स्तरावर असलेली 'बुद्ध राष्ट्र' ही ओळख यावर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या धम्मदीक्षेचे महत्त्व सांगतानाच, मानवतावादी बुद्ध धम्माचे पाईक व्हा आणि त्याचे तत्वज्ञान आचरणात आणून आपले जीवन सुखी व कल्याणकारी करा, असे आवाहन त्यांनी केले.

आदर्श उपक्रमाचा गौरव:



क्रांतीसूर्य संस्थेकडून यशोधरा बुद्ध विहार कमिटीचा गौरव

यावर्षीचा विशेष आकर्षण म्हणजे क्रांतीसूर्य सेवाभावी संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 'डीजे मुक्त' आणि 'व्यसनमुक्त' स्वरूपात साजरी करून समाजात एक आदर्श निर्माण केल्याबद्दल यशोधरा बुद्ध विहार कमिटीला सन्मानचिन्ह व पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी क्रांतीसूर्य संस्थेचे अध्यक्ष मा. अशोक मगर, मार्गदर्शक प्रा. संजय बागुल सर,अश्विन टाकणखार, स्वप्नील स्वामी,दिनेश निसर्गगंध, राज सोनवणे,दिपक गायकवाड उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजकुमार सोनवणे सर यांनी केले, तर सूत्रसंचालन विहाराचे सचिव बाबासाहेब जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष प्रा. आर. एम. कांबळे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी उपाध्यक्ष सुशीलाताई चांदमारे, प्रतिभाताई कांबळे,कमलताई डोंगरे, सुनिता टाकणखार, पुष्पा साळवे,महानंदा जावळे, बोराडेताई, मगरेताई,ऍड.रविंद्र टाकणखार, राजकुमार सोनवणे,सुधाकर वाघमारे,आकाश टाकणखार, सुमेध जाधव आणि स्वराज ससाणे यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या शेवटी सामुहिक शरणत्य ग्रहण करून आणि उपस्थितांना स्वादिष्ट 'खिरदान' देऊन सांगता करण्यात आली.

## पान ६ वरुन...

### कौटुंबिक कलहातून

त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत संगीता शिंदे, विष्णू वाजे आणि सविता वाजे यांना अटक केली आहे. नदीपात्रातून मोटारसायकलचा सांगाडा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांढरकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलिसांनी केली. सपोनि दीपक लंके या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### शौर्य जाधवची १७

आता डत्र्ल्लख राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा तेलंगणा येथे आहेत.

शौर्यच्या या यशामागे त्याचे प्रशिक्षक अझहर शेख, संजय धस आणि सागर सांगळे, फिटनेस कोच नासेर मोमीन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव आमेर सलीम, बीड तालुका क्रीडा अधिकारी रेवनाथ शेलार,

संतोष राठोड, अनिकेत काळे, जितू आरक, मोहीत परमार बीडजिल्हा क्रिकेट वकील संघ तसेच परभणीचे रोहन औंढेकर, लातूर विभागातील तालूकाक्रीडा अधिकारी जयरामजी मुंढे, डत्र्ल्लख महाराष्ट्र संघाचे व्यवस्थापक मुकेश बिराजदार आणि नाशिक जिल्हाक्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत तालूका क्रीडा अधिकारी तथा डत्र्ल्लख महाराष्ट्र प्रशिक्षक सर्वेश देशमुख यांचेही शौर्यला योग्य मार्गदर्शन लाभले.

शौर्य हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवक राज्य उपाध्यक्ष

ड्.शैलेश जाधव यांचा सुपुत्र असून, त्याने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर महाराष्ट्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याच्या या यशाबद्दल कुटुंबियांसह सर्वत्र आनंदाचे वातावरण असून, येथून पूढील स्पर्धेतही तो उत्कृष्ट कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### एसआयटी चौकशी सुरू,पण

धाडीत १ लाख ७६ हजार ५०० रुपये सापडल्याचा दावा

दिनांक १४ जून २०२२ रोजी वैष्णवी मंगल कार्यालय येथे सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेवर तत्कालीन आमदार प्रकाशदादा सोळंके व प्रहारचे गोपाळ पैंजणे,शिक्षण अधिकारी व पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई केली होती. त्यावेळी काही शिक्षक पालकांकडून १ लाख ७६ हजार ५०० रुपये रोख रक्कम घेताना आढळल्याचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणी माजलगाव पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ३८४, ३४ तसेच इतर तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. चौकशीदरम्यान वरिष्ठांच्या सांगण्यावरून पैसे घेत असल्याचे जबाब दिल्याचेही सांगण्यात आले आहे.

एस.आय.टी.चौकशी सुरु मग कारवाई का नाही?

या संपूर्ण प्रकरणाची डखढ चौकशी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. तरीही दोषींवर निलंबन, मान्यता रद्द, आर्थिक तपासणी किंवा प्रशासकीय कारवाई न झाल्याने शिक्षण विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मान्यता रद्द करा, दोषींना शिक्षा द्या

शाळेतील दोषी शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक तसेच कारवाईकडे दुर्लक्ष करणारे तत्कालीन अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करावी, शाळेची मान्यता रद्द करावी आणि विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शाळा शासन ताब्यात घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

जनतेचा सवाल – चौकशी फक्त कागदावरच?

एस.आय.टी. चौकशी सुरू असूनही प्रत्यक्षात कोणतीही कारवाई होत नसल्याने चौकशी फक्त कागदावरच का? असा सवाल पालक व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. आता शासन व शिक्षण विभागाने तत्काळ निर्णय घेऊन दोषींवर कारवाई करावी,अशी मागणी माजलगाव प्रहारचे गोपाळ पैंजणे यांनी केली आहे.

### निस्वार्थ सेवा आणि सामाजिक

म्हणाले की, प्रा.प्रदीप रोडे यांच्या हातून आदर्श शैक्षणिक कार्य घडत आहे. त्यांच्या नावातच प्रदीप म्हणजे प्रकाश आहे. भगवान बुद्धांच्या अत्तदीपो भव या संदेशाप्रमाणे त्यांनी स्वतः प्रकाशमान होत असंख्यांच्या जीवनात ज्ञानदीप प्रज्वलित केला आहे. त्यांचा सात्विक स्वभाव आणि समाजाभिमुख कार्य प्रेरणादायी आहे, असे म्हणाले.

तर, पुज्य भदंत धम्मशील थेरो यांनी प्रा. प्रदीप रोडे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे कौतुक केले. शून्यातून सुरू झालेला त्यांचा प्रवास कष्ट, परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर यशाच्या शिखरापर्यंत पोहोचला आहे. प्रचंड गरिबीत शिक्षण घेत त्यांनी शिकणाऱ्यापासून शिकवणाऱ्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास घडविला, असे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवर मा.रवींद्र जोगदंड, मा.अशोक शिरसे, मा.सुरेश लोंढे आणि मा.दीपक कदम यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त करत तुलसी शैक्षणिक संकुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी संस्थेच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत विविध शैक्षणिक, कौशल्यविकास आणि सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांकडे स्किल आणि विल असेल, तर तो जगाच्या पाठीवर कुठेही स्वाभिमानाने, अभिमानाने आणि आर्थिकदृष्ट्या सक्षमपणे उभा राहू शकतो. विशेषतः मुलींना सशक्त, स्वावलंबी आणि उद्योजक बनविणे हेच आमचे ध्येय आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रो.डॉ. मनोहर शिरसाट यांनी केले, तर आभार प्रा विद्या अवघडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समूहातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले. या भव्य सोहळ्यास बीड जिल्ह्यासह परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घाटनांदुर येथील इंडियन

होत असल्याचे स्वराज्य शक्ती सेना चे जिल्हाध्यक्ष नवनाथ तुळशीराम हारे यांच्या व घाटनांदुर व परिसरातील नागरिकातून सांगण्यात येत आहे पुरवठा विभागच्या दुर्लक्षामुळे नागरिकांची हेडसाळ होत असल्याचेही बोलले जात आहे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन घाटनांदुर येथील सर्व पेट्रोल पंपाची चौकशी करून नागरिकांची होत असलेली हेडसाळ दूर करून घाटनांदुर येथील पेट्रोल व डिझेल सुरळीत करावे असे नागरिकातून बोलले जात आहे.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत उज्वल यश

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या फेब्रुवारी २०२६





बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन यामध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ८३.०८ टक्के, कला शाखेचा ४३.९५ टक्के, वाणिज्य शाखेचा ५० टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम ६६.१२ टक्के निकाल लागला आहे .

बारावीच्या परीक्षेत सुंदराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम रेदासनी आलेक प्रमोद(८७.५ %), द्वितीय कुलकर्णी सुमेधा महेश (८५.८३% ), तृतीय इंद्राणी वरद दत्तप्रसाद(८३.१७ %), कला शाखातुन प्रथम बोरगे प्रज्ञा साहेबराव (७३.१७ %),द्वितीय पठाण सादिया अन्सर खान (७२.६७ %),तृतीय राऊत करण कारभारी (६८.८३%) तर वाणिज्य शाखा: प्रथम शर्मा सक्षम मनोज (८२.१७%), द्वितीय कासट खुशी विवेकानंद (७९.८३%), तृतीय धारक आदित्य भगवानराव (७८%) तर व्यावसायिक अभ्यासक्रम: प्रथम नवघरे रूपाली दगडोबा (७९.१७%), द्वितीय घेवारे अश्विनी आसाराम (७५% ), तृतीय यादव रंजना प्रकाश (७३.५०%) यांनी यश संपादन केले. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य ड.भानुदासराव डक,माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल.चव्हाण, प्राचार्य डॉ.जी. के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के. मुळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, पर्यवेक्षक महादेव अलझेंडे ,स्वप्निल टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांनी अभिनंदन केले.

## धोंडराई येथील जिल्हा परिषद शाळेचे यश

### स्टुडंट पोलीस कॅडेट छ.संभाजीनगर परिक्षेत्रातून तृतीय

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस ग्राउंड बालेपीर, बीड येथे राष्ट्रीय उपक्रमांतर्गत छ. संभाजीनगर परिक्षेत्रातून ६० शाळांचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये धोंडराई जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ता. गेवराई ही शाळा पात्र स्टुडंट पोलीस कॅडेट (एसपीसी) कार्यक्रमांतर्गत संभाजीनगर परिक्षेत्रातून तृतीय आली. याबद्दल शाळेतील विद्यार्थ्यांना तृतीय क्रमांकांचे पारितोषिक व प्रशिस्तीपत्रक तसेच पुष्पगुच्छ देवून जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीव काँवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्या उपस्थितीमध्ये मिळाले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गणेश शहाने, क्रीडा शिक्षक जगन्नाथ जाधव, डॉ.तात्यासाहेब मेघारे, जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर, एसपीसी सदस्य पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम अतिरिक्त पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या बहुमुल्य मार्गदर्शनाखाली व जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर यांच्या अधिपत्याखाली नोडल ऑफिसर पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार सखाराम घोलप, पोलीस नाईक मिलींद सारणीकर, पोलीस अंमलदार रोहीत शिंदे यांनी परिश्रम घेवून जिल्ह्यातील जि.प.मा.शाळा सौताडा ता.पाटोदा,



जि.प.मा.शाळा शिरुर का., जि.प.मा.शाळा धारुर, जि.प.मा.शाळा हरिनारायण आष्टा ता.आष्टी, जि.प.मा.शाळा चौसाळा, जि.प.मा.कन्या शाळा परळी, जि.प.मा.शाळा पात्रुड ता.माजलगाव, जि.प.मा.शाळा भाटुंबा ता.केज, जि.प.मा.शाळा राडी ता.अंबाजोगाई या १० जिल्हा परिषद शाळांमध्ये सायबर सुरक्षा, वाहतुकीचे नियम, पोलीस ठाण्याच्या कार्यालयीन कामकाजाची व शस्त्राची माहिती शाळेतील विद्यार्थ्यांना देवून मार्गदर्शन केले व तसेच सर्व विद्यार्थ्यांना बाह्यवर्ग प्रशिक्षण दिले.

# उमरी बु. ग्रामपंचायतीला शेतकरी संघर्ष समितीचा टाळा ठोको मोर्चा; अनेक गावांत आंदोलन तीव्र

माजलगांव । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील २०२५ च्या खरीप हंगामातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेला हेक्टरी १७ हजार ५०० रुपयांचा विमा अद्याप मिळालेला नसल्याच्या निषेधार्थ माजलगांव तालुक्यातील उमरी बु. येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालयावर टाळा ठोको मोर्चा काढण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकून शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.**

याचबरोबर खतगव्हाण, गुंजथडी, आबेगाव, घळावाडी, आनंदगाव, ढेपेगाव, उपळी आणि नि. टाकळी यांसह अनेक गावांमध्येही शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतींना टाळे ठोक आंदोलन करत विमा मिळावा, अशी मागणी लावून धरली. त्यामुळे संपूर्ण परिसरात आंदोलनाची तीव्रता वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले. शेतकरी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २०२५ मध्ये बीड जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टी झाली होती. बीड जिल्ह्यातील गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने जिल्ह्याला स्पेशल केस घोषित करत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी १७ हजार ५०० रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र घोषणा होऊन




अनेक महिने उलटूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप एक रुपयाही जमा झालेला नाही.

या संदर्भात यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना स्मरणपत्र देण्यात आले होते. बीड जिल्हा कायम दुष्काळी परिस्थितीचा सामना करणारा जिल्हा असून, कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शासनाने जाहीर केलेली मदत तात्काळ वितरित करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी बोलताना भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले की, शासनाने केवळ घोषणा करून शेतकऱ्यांची दिशाभूल करू नये. बीड जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई तातडीने मिळाली पाहिजे. अन्यथा येत्या काळात आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने शासनाला पुढील आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. विम्याचा प्रश्न मार्गी लागला नाही तर खासदार बजरंग सोनवणे यांच्या निवासस्थानावर १ जून रोजी मोर्चा काढण्यात येणार असून, ५ जून रोजी बीड जिल्ह्यातील आमदारांच्या घरासमोर स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच माजलगांवचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या निवासस्थानावरही मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला.महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर करण्यात आलेल्या या टाळा ठोको आंदोलनामुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी परिसरातून होत आहे.

# बीड येथिल राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी ठरतेय ज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रेरणेचे केंद्र

## शासनाच्या मदतीविना १७ वर्षांची परंपरा; ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी ठरतेय वरदान

बीड : मराठवाड्यातील शेती संकटे, हवामानातील बदल, वाढती उत्पादन खर्चाची कोंडी आणि बाजारातील अनिश्चितता या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, नवे प्रयोग व बाजाराभिमुख शेतीची दिशा दाखवणारे बीड येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आज शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शेतीतील नवतंत्रज्ञानाची माहिती मिळावी, उत्पादनक्षमता वाढावी आणि शेतीला उद्योगाचे स्वरूप प्राप्त व्हावे, या उद्देशाने किसान कृषी विकास प्रतिष्ठान गेल्या तब्बल १७ वर्षांपासून या भव्य कृषी प्रदर्शनाचे सातत्याने आयोजन करत आहे.

दरवर्षी प्रमाणे गेवराई त होणारे प्रदर्शन प्रथमच बीड मद्ये दि. १ ते ५ मे दरम्यान छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर पाच दिवसीय भव्य राज्यस्तरीय किसान कृषी महोत्सव भरवण्यात आला आहे. या प्रदर्शनाला बीड शहरासह बीड जिल्हा आणि मराठवाड्यातील विविध तालुक्यांतून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे. किसान कृषी विकास प्रतिष्ठान केवळ गेवराईपुरते मर्यादित न राहता बीड, जालना, परभणी, हिंगोलीसह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कृषी प्रदर्शनाचे आयोजन करत आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या



आग्रहामुळे यंदा पुन्हा एकदा बीड येथे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग (आत्मा प्रकल्प), वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना यांचा विशेष सहभाग असून शेतकऱ्यांना थेट तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळत आहे.

या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात आठ भव्य दालनांमधून तब्बल २०० हून अधिक कृषी उत्पादने व कंपन्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

यामध्ये १) आधुनिक कृषी अवजारे व यंत्रसामग्री २) ठिबक व तुषार सिंचन तंत्रज्ञान ३)सुधारित बियाणे व खते ४) जैविक शेतीसाठी आवश्यक साहित्य ५) शेतीपूरक व्यवसाय (दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन) ६)कृषी प्रक्रियाकरण उद्योग यांची प्रत्यक्ष माहिती व प्रात्यक्षिके पाहण्याची संधी शेतकऱ्यांना मिळत आहे.

प्रदर्शनादरम्यान तज्ज्ञांची चर्चासत्रे, मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून शेतीतील नव्या संधी, बदलते पीक पॅटर्न, बाजारपेठ व्यवस्थापन, हवामान आधारित शेती या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जात आहे. उद्घाटन व समारोप कार्यक्रमात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा 'कृषीरत्न पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होत आहे.

या प्रदर्शनात विविध प्रकारच्या स्टॉल्सवर सवलतीच्या दरात साहित्य उपलब्ध करून दिले जात असल्याने खरेदीसाठी शेतकऱ्यांची मोठी झुंबड उडत आहे. अनेक शेतकरी थेट आवश्यक अवजारे, यंत्रसामग्री खरेदी करून आर्थिक बचत करत असल्याचे चित्र आहे. एकूणच गेवराई येथील पाच दिवशीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन हे केवळ एक कार्यक्रम न राहता शेतकऱ्यांसाठी ज्ञान, तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि प्रेरणेचे व्यासपीठ ठरत आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीकडे वळण्यासाठी हे प्रदर्शन खऱ्या अर्थाने मार्गदर्शक व आशेचा किरण ठरत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

मराठवाड्यात कृषी प्रदर्शनाची संकल्पना २००७ साली प्रथमच किसान कृषी विकास प्रतिष्ठानने 'शेतकरी केंद्रबिंदू' मानून राबवली. सुरुवातीला प्रचंड खर्च, मर्यादित साधनसामग्री असूनही शेतकऱ्यांच्या प्रतिसादामुळे हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवण्यात आला. २०१३ ते २०१७ या काळात राज्य शासनाच्या कृषी विभागाकडून आत्मा अंतर्गत केवळ १ ते १.५ लाख रुपयांची अत्यल्प मदत मिळत होती. मात्र २०१८ पासून २०२५ पर्यंत शासनाची कोणतीही मदत न घेता, हे कृषी प्रदर्शन स्वखर्चातून व काही प्रायोजक कंपन्यांच्या सहकार्याने अविरत सुरू आहे. विशेष बाब म्हणजे शासनाने धोरण बदलून प्रत्येक जिल्ह्यासाठी २० लाख रुपयांची तरतूद केली असतानाही, कृषी विभागातील अधिकारी वर्गाच्या हेकलेखोर धोरणामुळे आणि केवळ कागदावरच मर्यादित राहणाऱ्या 'जिल्हा कृषी महोत्सवां'मुळे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कृषी प्रदर्शन करणाऱ्या संस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरीही कोणतीही खंत न बाळगता किसान कृषी विकास प्रतिष्ठान शेतकऱ्यांच्या हितासाठी मोठ्या दिमाखात व निष्ठेने हे कृषी प्रदर्शन सातत्याने आयोजित करत आहे, ही बाब कौतुकास्पद आहे.स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेदरे यांनी तब्बल १७ वर्षांपूर्वी रोवलेला कृषी प्रदर्शनाचा हा यज्ञ आजही तेवढ्याच ताकदीने, सातत्याने आणि भव्यतेने सुरू आहे, ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे. विशेष म्हणजे अतिशय कमी वयातही आयोजक महेश बेदरे यांनी दाखवलेले काटेकोर नियोजन, सातत्य आणि शेतकरीहिताची स्पष्ट भूमिका यामुळे हा उपक्रम केवळ टिकून नाही, तर दरवर्षी अधिक व्यापक स्वरूप धारण करत आहे. शासनाच्या अपुऱ्या मदतीत, अनेक अडचणींना सामोरे जात असतानाही शेतकरी केंद्रबिंदू ठेवून प्रदर्शन अविरत सुरू ठेवण्याची जिद्द व नियोजनशक्ती हे महेश बेदरे यांच्या कार्यकौशल्याचे द्योतक आहे. स्व. गणेशराव बेदरे यांचे स्वप्न जपत ते पुढे नेण्याचे कार्य महेश बेदरे अत्यंत जबाबदारीने पार पाडत असून, मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन आज विश्वासाचे व प्रेरणेचे केंद्र ठरत आहे.

# हायड्रोपोनिक पद्धतीने स्ट्रॉबेरी लागवड

शेती करत असताना माती आणि पाणी नसेल तर शेतीमध्ये पिके मिळवण्याबाबत कल्पनाच केली जाऊ शकत नाही. मात्र, शेतीमध्ये सध्या नवनवीन तंत्रज्ञानाचा शिरकाव होत असून, शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळवणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे शेतकरी हायड्रोनिक्स या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करत, विना मातीचे मोठी कमाई करत आहे. एका शेतकऱ्याने हायड्रोनिक्स तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करत, स्ट्रॉबेरी पिकाचे उत्पादन घेतले आहे. ज्यातून त्याला लाखो रुपयांची कमाई झाली आहे.

धीरज वर्मा असे या शेतकऱ्याचे नाव असून, तो उत्तर प्रदेशमधील बाराबंकी जिल्ह्यातील रहिवासी आहे. धीरज वर्मा हा बीएस्ससी पदवीधर असून, त्याने शिक्षणानंतर नोकरीच्या मागे न लागता शेतीची वाट धरली. त्यासाठी त्याने पॉलीहाऊस उभारून हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्याचा निर्धार केला. यासाठी त्याने महाराष्ट्रातील महाबळेश्वरसारख्या थंड हवेच्या ठिकाणी येणाऱ्या स्ट्रॉबेरी या पिकाची निवड केली. विशेष म्हणजे विना माती आणि अगदीच कमी पाण्यात त्याने स्ट्रॉबेरीचे हे उत्पादन घेतले आहे.

हायड्रोपोनिक प्रकारची शेती ही इस्त्राएलमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. या पद्धतीमध्ये केवळ पाण्यावर पिके घेतली जातात. शेतकरी धीरज वर्मा यांनी हीच हायड्रोपोनिक पद्धत वापरून स्ट्रॉबेरीची रोपे लावली आहेत. साधारणपणे त्यांना एका हंगामामध्ये धीरज वर्मा यांनी पाच टन स्ट्रॉबेरीचे उत्पादन काढले आहे. याच स्ट्रॉबेरीच्या उत्पादनातून त्यांना आतापर्यंत एकूण तीन लाख रुपयांचा नफा देखील झाला आहे. सध्या त्यांच्या स्ट्रॉबेरी पिकाची काढणी सुरु असून, त्यांना त्यातून आणखी नफा मिळणार असल्याचे ते सांगतात.

महाराष्ट्राच्या मातीतील पीक

स्ट्रॉबेरी हे एक बेरी वर्गीय फळ आहे. हे एक लहान आकाराचे फळ असून लाल रंगाचे फळ आहे. ते थंड प्रदेशात होते. सुगंध, लाल रंग, रसाळपणा आणि गोडपणा यामुळे हे फळ प्रसिद्ध आहे. स्ट्रॉबेरीमध्ये कर्बोहायड्रेटस जीवनसत्त्व 'क' , 'ब' आणि कॅल्शियम, लोह, स्फुरद इत्यादी घटक भरपूर प्रमाणात असतात. साधारणपणे महाराष्ट्रातील महाबळेश्वर स्ट्रॉबेरीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे.




# कांदा संच तयार करण्याची पद्धत

कांद्याची लागवड अनेक प्रकारे केली जाते. योग्य उत्पादन मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. यापैकी एक म्हणजे सॅट्स उत्पादन पद्धत. हे एक जुने तंत्रज्ञान आहे, परंतु आजही ते मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते.

कांदा हे नगदी पीक आहे, म्हणून त्याच्या लागवडीला फायदेशीर शेती म्हणतात. बाजारात कांद्याला नेहमीच मागणी असते. त्याच वेळी, कांद्याशिवाय जेवणाची चव मंद राहते. तसेच, कांद्याचा वापर शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये केला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. कांद्याने मधुमेह आणि रक्तदाब नियंत्रित ठेवता येतो. खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड करतात. पण तुम्ही कांदा संच उत्पादन पद्धतीबद्दल ऐकले आहे का? तुम्ही ऐकले नसेल तर ही पद्धत काय आहे ते आम्ही तुम्हाला सांगत आहोत. तसेच आम्ही तुम्हाला सांगतो की या पद्धतीने शेती केल्यास शेतकरी एका एकरात २० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळवू शकतात. आम्हाला कळू द्या.

उत्पन्न पद्धत काय आहे?: कांद्याची लागवड अनेक प्रकारे केली जाते. योग्य उत्पादन मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. यापैकी एक म्हणजे उत्पादन पद्धत. हे एक जुने तंत्रज्ञान आहे, परंतु आजही ते मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते. या पद्धतीत प्रामुख्याने शेतीच्या चार पायऱ्यांचा अवलंब केला जातो. हे चार टप्पे आहेत बीजन तयार करणे, खतांचा वापर, बीजप्रक्रिया आणि पेरणी. या चार पद्धतींनी सेट पद्धतीने कांद्याची लागवड केली जाते.पेरणीची तयारी - मार्चच्या पहिल्या



आठवड्यापासून, शेतकरी एन-५३ आणि भीमा डार्क रेड जातीच्या कांद्याची पेरणी करतात. या प्रक्रियेत कांदा पेरताना दिवसभर सूर्यप्रकाश राहील अशा ठिकाणी बेड तयार केला जातो आणि काळजी घेणे सोपे जाते. तसेच, बेडची लांबी तीन मीटर, रुंदी एक मीटर आणि उंची १५ ते २० सेमी असावी.

खताचा वापर - या मशागतीच्या पद्धतीमध्ये पेरणीपूर्वी २० ते २५ किलो कुजलेले शेणखत आणि १०० ग्रॅम मिश्र खत प्रति बेडमध्ये वापरावे. बीजप्रक्रिया- पेरणीपूर्वी बियाण्यास कॅप्टन, बाविस्टिन, थिरम यांसारख्या बुरशीनाशकाची २ किंवा ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्याची प्रक्रिया करावी. बिया कोरड्या भांड्यात ठेवा आणि ते औषधासह हलक्या पाण्याच्या संपर्कात येईपर्यंत ढवळत राहा, जेणेकरून औषध बियांना चांगले चिकटेल. पेरणी- या पद्धतीने शेती करण्यासाठी पेरणीपूर्वी बिया सावलीत वाळवाव्यात. त्यानंतर प्रति बेड १२५ ते १५० ग्रॅम बियाणे पेरणी करावी. अशाप्रकारे खरिपात सुमारे २० क्विंटल प्रति हेक्टर दराने कांद्याचे चांगले उत्पादन घेता येते. पद्धतीमध्ये या चार पद्धतींचा समावेश करण्यात आला आहे ज्याचा वापर करून शेतकरी चांगले उत्पादन घेऊ शकतात. कांदा आता फायदेशीर पीक म्हणून सिद्ध होत आहे, त्यामुळे शेतकरी पद्धतीचा पुरेपूर लाभ घेऊ शकतात.

# भरघोस उत्पादनासाठी जाणून घ्या कापसाचे प्रमुख वाण

खरीप हंगामाला येत्या काही दिवसात सुरुवात होणार आहे. खरिपात यंदाही कापसाची मोठ्या प्रमाणात लागवड होण्याची शक्यता आहे. खरे तर गेल्या वर्षी कमी पाऊस झाला होता तरी देखील कापसाची लागवड मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाली.


यंदा मात्र हवामान खात्याने चांगल्या पावसाची शक्यता वर्तवली असून, यामुळे यावर्षी कापूस लागवड वाढणार असल्याचे जाणकारांकडून सांगितले जात आहे. याच पार्श्वभूमीवर कापसाच्या काही प्रमुख जातींची माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

'हे' आहेत कापसाचे प्रमुख वाण - नुझिवेदू सीड्स कंपनीचे आशा बी टी २ :

गेल्या वर्षी कापसाच्या या जातीपासून शेतकऱ्यांनी चांगले उत्पादन मिळवले आहे. दुष्काळी परिस्थिती असताना देखील शेतकऱ्यांनी १८ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवले आहे.

अशा परिस्थितीत जर मान्सून सामान्य राहिला तर या जातीपासून २१ ते २२ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळू शकते, असा दावा कंपनीकडून केला जात आहे.या जातीचे कापूस बोंड टपोर असते आणि कापसाला वजन चांगले मिळते.

२७ ते २९ एमएम धागा असतो. म्हणजेच ही एक मिडीयम स्टेपल कापसाची जात आहे. बागायती भागासाठी हा वाण योग्य असल्याचे



आढळून आले आहे.

मोक्ष १५ ३९ २ : कापसाच्या या जातीपासून देखील गेल्यावर्षी शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन मिळवले आहे. या जातीपासून ड्रीप इरिगेशन करून गेल्यावर्षी शेतकऱ्यांनी १९ ते २० क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवले आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पेरणी केली तरी यातून चांगले उत्पादन मिळते. या जातीच्या कापसाचा धागा हा २५ ते २९ एमएम एवढा म्हणजेच मध्यमच स्टेपल आहे. या जातीवर रसशोषक किडीचा आणि रोगांचा फारसा प्रादुर्भाव पाहायला मिळत नाही.

तुळसी कंपनीचे कबड्डी : जे शेतकरी कापसाची लागवड करतात. त्यांना या जातीची माहिती असेल. हा वाण संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय या जातीची राज्यातील अनेक भागांमध्ये लागवड केली जाते. मराठवाडा आणि विदर्भ येथील प्रमुख कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये या जातीच्या कापसाची लागवड पाहायला मिळते. या जातीबाबत बोलायचे झाले तर कीड, रोगास कमी बळी पडते. जास्त पाऊस पडला म्हणजे अतिवृष्टीसारखी परिस्थिती तयार झाली तरी चांगले उत्पादन मिळते. आणि कमी पाऊस पडला तरी देखील यातून चांगले उत्पादन मिळते.

युएस अ‍ॅग्री सीड्स कंपनीचे युएस ७०६७ : या जातीपासून देखील १२ ते १७ क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळते. शेतकऱ्यांमध्ये ही जात बऱ्यापैकी लोकप्रिय असून बागायती आणि जिरायती अशा दोन्ही परिस्थितींमध्ये या जातीचे उत्पादन घेतले जाऊ शकते.

अ‍ॅग्रो स्टार कंपनीचे शिवांश : या जातीची देखील राज्यातील काही शेतकरी लागवड करतात. मात्र, या जातीची बागायती भागात लागवड केल्यास चांगले उत्पादन मिळते. कोरडवाहू भागात याची लागवड करू नये, असा सल्ला देण्यात आला आहे. या जातीपासून १८ ते १९ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७७५ : पेरीस देशांत उघडणाऱ्या आणि बंद होणाऱ्या छत्रीचा शोध लावण्यात आला.
१७८० : अमेरिकन एकेडमी ऑफ आर्ट्स अँड सायन्सची स्थापना करण्यात आली.
१७९९ : श्रीरंगपट्टणमच्या लढाईत टिपू सुलतान ब्रिटिशांकडून मारला गेला.
१८५४ : भारतातील पहिले टपाल तिकीट प्रकाशित झाले.
१९०४ : अमेरिकेने पनामा कालव्याचे काम सुरू केले.
१९१० : रॉयल कॅनेडियन नेव्ही ची स्थापना.
१९३० : ब्रिटीश पोलिसांनी महात्मा गांधींना अटक करून येरवडा तुरुंगात ठेवले.
१९५९ : पहिले ग्रॅमी पुरस्कार आयोजीत केले गेले.
१९६७ : श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर नाशिक येथील मंदिरात जाऊन देवाची पूजा करण्याचा अधिकार सर्वांना आहे असा उच्च न्यायालयाचा निर्णय.
१९७९ : मार्गारेट थॅचर युनायटेड किंग्डमच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या.
१९८९ : सर्व पंचायत समित्यांमधे महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवल्या जातील, अशी पंतप्रधान राजीव गांधी यांनी घोषणा केली.
१९९२ : संगीतकार भूपेन हजारिका यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
१९९५ : 'बॉम्बे' वजी 'मुंबई' हेच मूळ नाव अधिकृत राहील, असा शिवसेना-भाजप युती यांच्या राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.
१९९५ : महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने 'बॉम्बे' चे 'मुंबई' असे नामकरण करण्याचा निर्णय घेतला.
१९९६ : जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारताला सहा पदके, एन. कुंजुरानीदेवीला दोन रौप्यपदके

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१००६ : पर्शियन सुफि संत अबू इस्माल अब्दुल्लाह अल-हेरावी अल-अंसारी उर्फ अब्दुल्ला अन्सारी यांचा जन्मदिन.
१००८ : ख्वाजा अब्दूल्ला अन्सारी पर्शियन सूफी संत (मृत्यू: १०८८)
१००८ : हेन्री (पहिला) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ४ ऑगस्ट १०६०)
१६४९ : छत्रसाल बुंदेला बुंदेलखंडचा महाराजा (मृत्यू: २० डिसेंबर १७३१)
१६५५ : पियानोचे निर्मिते बार्टोलोमीओ क्रिस्टोफोरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १७३१)
१७६७ : त्यागराज दाक्षिणात्य संगीतकार (मृत्यू: ६ जानेवारी १८४७)
१९०२ : भारतातील कर्नाटक राज्याचे पहिले मुख्यमंत्री क्यासमांबल्ली चेंगलुराया रेड्डी यांचा जन्मदिन.
१८२५ : थॉमस हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ, विज्ञानकथालेखक आणि डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा खरा समर्थक (मृत्यू: २९ जून १८९५ इस्ट्बोर्न, इंग्लंड)
१८४७ : महर्षी विनायक रामचंद्र उर्फ अण्णासाहेब पटवर्धन धार्मिक आणि राष्ट्रीय मनोवृत्तीचे पुण्यातील एक नामांकित धन्वंतरी व लोकमान्य टिळकांचे स्नेही (मृत्यू: २ फेब्रुवारी १९१७)
१८४९ : ज्योतिरिंद्रनाथ टागोर थोर बंगाली साहित्यिक, नाटककार, संगीतकार, चित्रकार व संपादक, रविंद्रनाथ टागोर यांचे वडील बंधू, त्यांनी लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याचे बंगालीत भाषांतर केले (मृत्यू: ४ मार्च १९२५ रांची, झारखंड)
१९२८ : होस्नी मुबारक इजिप्तचे चौथे राष्ट्राध्यक्ष
१९२९ : ऑड्रे हेपबर्न ब्रिटिश अभिनेत्री, संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीच्या सदिच्छा प्रतिनिधी, 'रोमन हॉलिडे' या चित्रपटातील अभिनयाबद्दल त्यांना ऑस्कर पुरस्कार मिळाला. (मृत्यू: २० जानेवारी१९९३)
१९२९ : वीरसेन आनंदराव तथा 'बाबा' कदम गुप्तहेरकथालेखक (मृत्यू: २० आक्टोबर २००९)
१९३३ : प्रख्यात मराठी कादंबरीकार बाबा कदम यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर २००९)
११३४ : महात्मा बसवेश्वर.
१९३४ : अरुण दाते भावगीत गायक
१९४० : रॉबिन कूक इंग्लिश कादंबरीकार
१९४२ : सत्यनारायण गंगाराम तथा सॅम पित्रोडा भारतातील दूरसंचारसेवांचा विस्तार करण्यास कारणीभूत असलेले शास्त्रज्ञ, पंतप्रधानांचे विज्ञान व तंत्रज्ञानविषयक सल्लागार
१९४३ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ प्रसांत पटनाईक याचा जन्म.
१९४५ : भारतीय पत्रकार आणि कस्तुरी कुटुंबाचे सदस्य तसचं, 'द हिंदू' समुहाचे माजी व्यवस्थापकीय संचालक व माजी मुख्य संपादक एन. राम यांचा जन्मदिन.
१९८४ : मंजुरूल इस्लाम बांगला देशचा क्रिकेटपटू (मृत्यू: १६ मार्च २००७)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९९ : टिपू सुलतान, म्हैसुरचा वाघ म्हणून ओळखला जाणारा पराक्रमी श्रीरंगपट्टणम येथे इंग्रजांशी लढताना मारला गेला.
१७९९ : हैदरअलीचा थोरला मुलगा व मैसूरचा वाघ, शहाबहादूर फतेह अली खान ऊर्फ टिपू सुलतान इंग्रजांबरोबर झालेल्या लढाईत ठार झाला. (जन्म: २० नोव्हेंबर १७५०)
१९०५ : स्वातंत्र्य भारतातील पहिला महिला न्यायाधीश तसचं, उच्च न्यायालयाच्या पहिल्या भारतीय महिला न्यायाधीश आणि स्वातंत्र्यपूर्व भारतातील एमिली मर्फी यांच्यानंतर न्यायाधीश पदी विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला अण्णा चंडी यांचा जन्मदिन.
१९६८ : बंगाली साहित्यिक आशुतोष मुखोपाध्याय यांचे निधन.
१९८० : अनंत काणेकर चतुरस्त्र साहित्यिक, कवी व पत्रकार, 'पद्मश्री' व 'सोविएत लँड नेहरू पुरस्कार' विजेते. मुंबईतील 'नाट्यमन्वंतर' या प्रयोगशील नाट्यसंस्थेचे ते एक संस्थापक होते. (जन्म: २ डिसेंबर १९०५)
१९८० : जोसेफ टिटो क्रांतिकारक आणि युगोस्लाव्हियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ७ मे १८९२)
१९३८ : ज्युदोचे संस्थापक कानो जिगोरो यांचे निधन. (जन्म: २८ ऑक्टोबर १८६०)
२००८ : किशन महाराज तबलावादक (जन्म: ३ सप्टेंबर १९२३)

# पाथर्डी शहरात बंदिस्त भाजी मंडई सुरु करण्यासाठी शेतकऱ्यांची आर्त हाक!

पाथर्डी। प्रतिनिधी

बाजारात उन्हाच्या तीव्र लाटेचा फटका बसून रखरखत्या उन्हात ग्राहकांच्या प्रतीक्षेत माल घेऊन बसलेले शेतकरी पोटासाठी मरण येताना भोगत आहेत त्यांच्यासाठी ना निवारा ना पिण्याच्या पाण्याची सोय ठेकेदारामार्फत मात्र पठाणी पद्धतीने बाजार पावतीची वसुली सुरू आहे पाथर्डी शहराचे तापमान ४२ ते ४३ अंश सेल्सिअस आहे बुधवारी आठवडे बाजारात परिसरातील गावांमधून शेतकरी बाजारच्या खर्चापुरता भाजीपाला कडधान्य असे विक्रीसाठी आणतात फळ व्यापारी बेकरी उत्पादने हलवाई व्यावसायिक असे व्यापारी आपली पाले लावून व्यवसाय करतात मात्र ज्या शेतकरी वर्गासाठी बाजार तळाची सुविधा केली आहे तो शेतकरी मात्र सकाळी साडेसात पासून संध्याकाळी सात वाजेपर्यंत उघड्यावर दोन पायावर बसून किंवा एखादे रिकामे पोते जमिनीवर टाकून माल विकण्यासाठी बसतो बाजारामध्ये सध्या कांदा कोथिंबीर गवार चवळीच्या शेंगा शेवग्याच्या शेंगा वांगे बीट टोमॅटो काकडी हिरवी मिरची अशा शेतमालाला



अजिबात भाव नाही तशीच परिस्थिती कमी अधिक फरकाने डाळिंब टरबूज चिकू या फळांची आहे.

एका बाजूने कृषी उत्पादनांना भाव नाही तर दुसऱ्या बाजूने तीव्र उन्हामुळे पााले भाज्या कृषी मालाला ग्राहक नाही उन्हाच्या वेळी ग्राहक घराबाहेरच पडत नाही सद्यस्थितीत अत्यंत वेदनादायक चित्र म्हणजे पााथर्डी पूर्व भागातील काही शेतकऱ्यांनी कोथिंबीर वांगी गवारीच्या शेंगा असा शेतमाल विक्रीसाठी आणला दोन घमेल्यांमध्ये हा सर्व माल आला गावाकडून पाथर्डीला यायला जीपवाल्याने ३० रुपये भाडे घेतले १० रुपयाची बाजाराची पावती गेली २० रुपयाची पाण्याची बाटली दोन वेळा चहा घेतला त्याचे २० रुपये झाले घरून चटणी व दोन भाकरी आणल्या होत्या बाजारात उन्हात बसूनच त्या पाण्यासोबत खाल्ल्या दुपारपर्यंत ५५ रुपयांची विक्री झाली वांग्याला कोणी विचारीना थोड्याफार गवारीच्या शेंगा विकल्या संध्याकाळी सहा वाजेपर्यंत बसायचे न विकलेला माल रस्त्यावर फेकून द्यायचा गावाकडे निघतेवेळी मिळाली एस.टी.तर अर्ध्या तिकीट म्हणून १० रुपयात गावाकडे जाणे होईल नाहीतर डुग्यावाला (रिक्षावाला) परत ३० रुपये मागणारच आहे उन्हात काम करायला मजूर मिळत नाही त्यामुळे पहाटे लवकर उठून भाजीपाला तोडायचा दिवसभर उन्हात अंग जाळून घेतल्यावर पुन्हा बाजाराला जाऊन भाजीपाला विकायचा आणि कवडीमोल भावाने विकायचा या विवंचनेमुळे भाजीविक्रेत्या महिलांचा सवाल मन अस्वस्थ करणारा आहे पाथर्डी शहरात पालिकेतर्फे बंदिस्त भाजी मंडई सुसज्ज स्वच्छतागृह पिण्याचे पाणी शहरात फिरणाऱ्या मोकाट जनावरांपासून सुरक्षा अशा मूलभूत सुविधा शेतकऱ्यांसाठी आवश्यक आहेत उष्णतेच्या लाटेच्या अस्मानी संकटापुढे सर्वजण हतबल झाले असून बाजारपेठ पूर्णपणे शांत झाली आहे ग्राहकांचा पत्ता नाही आर्थिक मंदीच्या लाटेपुढे विपरीत वातावरण निर्माण झाले आहे तीव्र उन्हामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने घसरत असून भूपृष्ठावरील पाणीसाठे सुद्धा संकटात आली आहेत पाणी परिस्थिती गॅस टंचाई उन्हाची तीव्रता बघता तूर्तास तरी जीवनावश्यक शारीरिक स्वास्थ्य अबाधित ठेवणे महत्त्वाचे आहे.

## पुष्पा स्टाईल करत नवनिर्वाचित आ.विवेक कोल्हेंचा हटके अंदाज

कोपरगाव/अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात सध्या एकाच नावाची जोरदार चर्चा आहे, ती म्हणजे नवनिर्वाचित आमदार विवेक कोल्हे. विधानपरिषदेवर बिनविरोध निवड झाल्यानंतर कोपरगावच्या भूमीत त्यांचे जे ऐतिहासिक स्वागत झाले, जेसीबी मशीनच्या लोडरमधून त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. या मिरवणुकीत अनेक कार्यकर्ते उंट आणि घोड्यावर बसून सामील झाले. यावेळी कोल्हे यांनी बँडच्या तालावर ठेका धरला आणि भर चौकात दंड थोपटले, मिशांना पीळ दिला आणि 'पुष्पा' स्टाईल करत हटके अंदाज पाहायला मिळाला.

कोपरगाव शहरात जणू भाजप कार्यकर्त्यांचा महापूर लोटला होता. जेसीबीमधून पुष्पवृष्टी करत अनेक जेसीबी उभे करून त्यावरून विवेक कोल्हेंवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तसेच अनेक ठिकाणी क्रेनच्या साह्याने ५० फुटी हार घालण्यात आला. कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून स्वतः विवेक कोल्हे यांनी देखील बँडच्या तालावर ठेका धरला आणि आनंद साजरा केला. कोल्हेंच्या समर्थनार्थ घोषणाबाजीने संपूर्ण शहर भाजपमय झाले होते.कोपरगाव विधानसभा मतदारसंघ सध्या राष्ट्रवादीकडे असला, तरी विवेक कोल्हे यांच्या विधानपरिषदेवरील एन्ट्रीमुळे भाजपची ताकद प्रचंड वाढली आहे. 'कोल्हे' यांच्या आमदारकीमुळे आगामी निवडणुकीत भाजप अधिक आक्रमकपणे उतरणार असल्याचे स्पष्ट संकेत या शक्तीप्रदर्शनातून मिळाले आहेत. ''हा विजय कोपरगावच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. ही तर फक्त सुरुवात आहे, अजून बराच पल्ला गाठायचा आहे,'' अशा भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.''मी थांबलो होतो त्याचेच फळ आपल्या पक्षाच्या नेत्यांनी मला आज दिलेलं आहे. त्याबद्दल कार्यसम्राट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खूप आभारी आहे. आपणही टाळ्या वाजवून त्यांचे आभार मानायचे आहेत.

मी धन्यवाद धन्यवाद म्हणतो, आपण देवाभाऊ धन्यवाद म्हणायचं आहे. आज मी फार फार काही संवाद साधणार नाही. आपण कोल्हे कुटुंबावर एवढे प्रेम करता त्याबद्दल खूप खूप धन्यवाद. आमदार म्हणून मला संधी मिळाली आहे. तळागळातील आपल्या सर्व कार्यकर्त्यांमध्ये तुमचं देखील नाव आहे'', असं विवेक कोल्हे म्हणाले.

## बारावी परीक्षेत रघुनंदन बियाणी प्रथम

मंठा। प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय मंठाचा विद्यार्थी रघुनंदन गोपाल बियाणी हा इयत्ता बारावी परीक्षेत ७८.६७ टक्के मार्क घेऊन मंठा तालुक्यात प्रथम आला आहे. रघुनंदन हा वाणिज्य शाखेचा विद्यार्थी असून त्याने वाणिज्य, कला व विज्ञान या शाखेमधून सुद्धा प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. त्याने आपल्या यशाचे श्रेय आई - वडील, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद यांना दिले. पुढे एमबीए करून इंडस्ट्रियल (उद्योग) क्षेत्रात करियर करण्याचा मानस रघुनंदन याने व्यक्त केला. बारावी परीक्षेत मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# वेरुळ लेणीत मधमाशांचा मोठा हल्ला, १०० पर्यटकांना चावा

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरुळ लेणीत आज एक अनपेक्षित घटना घडली आहे. वेरुळ लेणीत फिरण्यासाठी गेलेल्या पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मधमाशांनी पर्यटकांवर आज दुपारी मोठा हल्ला केला. या हल्ल्यात जवळपास १०० पर्यटकांना मधमशांची चावा घेतल्याची माहिती आहे. या दुर्घटनेनंतर एक महिला पर्यटकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. महिलेवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पण या घटेनमुळे एकच खळबळ उडाली आहे. तसेच या घटनेनंतर पुन्हा एकदा लेणी परिसरात पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

१ मे महाराष्ट्र दिवसाची सुट्टी आणि शनिवार-रविवार अशा दोन दिवसांची अशा तीन दिवसांची सुट्टी एकत्र आल्याने अनेक जण पर्यटनासाठी बाहेर पडले आहेत. पर्यटकांकडून वेगवेगळ्या पर्यटनस्थळी भेट दिली जात आहे. अशाप्रकारे वेरुळच्या लेणीच्या पर्यटनासाठी आज शेकडो पर्यटक दाखल झाले होते. पर्यटक अत्यंत आनंदात होते. पण अचानक त्यांच्या आनंदावर विरझन पडलं. कारण अचानक लेणी क्रमांक १६ आणि १० परिसरात मधमाशांचे मोहळ उठले. मधमाशांच्या मोठ्या समूहाने थेट पर्यटकांवर हल्ला करण्यास सुरुवात केली.

यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. पर्यटक स्वत:चा जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले. पण या हल्ल्यात मधमाशांनी १०० पर्यटकांना चावा घेतल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. मधमाशांनी चावा घेतल्यामुळे एका महिलेची प्रकृती जास्त बिघडली. या महिलेला तातडीने शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तिथे तिला दाखल करण्यात आलं. या महिलेवर सध्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दुसरीकडे घटनेच्या पार्श्वभूमीवर पुरातत्व विभाग आणि स्थानिक प्रशासनाने संबंधित परिसरात तात्पुरत्या स्वरुपात प्रवेशबंदी केली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर या भागात प्रवेश करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.दरम्यान, वेरुळ लेणीत अशाप्रकारे मधमाशांचा हल्ला होण्याची पहिली घटना नाही. याआधीदेखील अशा घटना घडल्या आहेत.

तरीदेखील पर्यटकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर तोडगा निघालेला नाही. याआधी ८ एप्रिल २०२३ रोजी अशाच प्रकारची घटना घडली होती. विशेष म्हणजे १६ क्रमांकाच्याच कैलास लेणीच्या परिसरात ही घटना घडली होती. त्यावेळी मधमाशांनी १५ ते २० पर्यटकांना जखमी केले होते. यानंतर दोन वर्षांनी पुन्हा अशीच घटना समोर आली आहे. पण आज घडलेल्या घटनेती व्याप्ती जास्त आहे. कारण मधमाशांनी तब्बल १०० जणांना चावा घेतल्याची माहिती आहे.

## डॉ. शरद शेळके यांना पितृशोक

मंठा। प्रतिनिधी

मंठा शहरातील प्रतिष्ठित डॉ. शरद शेळके यांचे वडील स्व. देविदासराव विठ्ठलराव शेळके यांचे ता. २९ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. स्व .देविदासराव शेळके यांनी समाजकारण व राजकारणात मोठे योगदान दिले. शेळके अंभोरा या गावचे ते १५ वर्षे सरपंच होते, काही वर्षे चेअरमन होते तथा मार्केट कमिटी संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मंठा पंचक्रोशीत ते सर्वांना सुप्रसिद्ध होते.त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



## पदभार स्वीकारण्यापूर्वी नूतन पोलीस अधीक्षक साईचरणी झाले नतमस्तक

शिर्डी। प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी नव्याने नियुक्त झालेले सुदर्शन मुम्मुक्का यांनी शनिवारी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी शिर्डीत जाऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. ''जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गुन्हेगारांवर कडक लगाम घालणार असून, नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना केले.

नूतन पोलीस अधीक्षक मुम्मुक्का म्हणाले, जिल्ह्याचा सखोल अभ्यास करून गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी कडक धोरण अवलंबले जाईल. कायदा-सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास नागरिकांनी थेट माझ्याशी किंवा पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. नागरिकांच्या सतर्कतेतूनच जिल्हा गुन्हेगारीमुक्त करणे शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. घार्गे यांच्या अचानक झालेल्या बदलीमुळे जिल्ह्यात चर्चेला उधाण आले आहे. अशा परिस्थितीत मुम्मुक्का यांच्यासमोर तपासाचा मोठा डोंगर उभा आहे. विशेषतः राज्यभर गाजत असलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणातील तपासाला गती देणे आणि वेळेत आरोपपत्र (चार्जशीट) दाखल करणे हे त्यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. या प्रकरणातील पुराव्यांची साखळी मजबूत करून निष्पक्ष कारवाई करण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अहिल्यादेवी होळकर जयंतीपूर्वी शहरातील पुतळ्याचे पुर्नरचना, परिसराचे मजबुतीकरण करा

### मुख्याधिकारी यांना मिनाक्षीताई देवकते यांचे निवेदन

बीड। प्रतिनिधी

शहरामधील सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. सार्वजनिक पैशांचा अपव्यय टाळण्यासाठी आणि महापुरुषांच्या स्मारकांचा आदर राखण्यासाठी तात्पुरती डागडुजी न करता दर्जेदार व कायमस्वरूपी काम होणे अत्यंत आवश्यक असून येते ३१ मे २०२६ च्या अगोदर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याची पुर्नरचना करुन परिसराचे मजबुतीकरण व सुशोभिकरण करण्यात यावे अशी मागणी बीड न.प.चे मुख्याधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र धनगर महासंघ व महाराष्ट्र धनगर समाज अहिल्या आघाडीच्या प्रदेश सचिव मिनाक्षीताई देवकते-डोमाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या धनगर समाजासह सर्व समाजासाठी अत्यंत आदराचे आणि श्रद्धेचे स्थान आहे. गेल्या काही दिवसांपासून या पुतळ्याच्या खालील पाया आणि जवळचा भाग खचत चाललेला आहे. यापूर्वी दोन वेळेस येथे तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली होती, परंतु ती



टिकली नाही. पुतळ्याची सुरक्षितता आणि पावित्र्य राखण्यासाठी येथे कायमस्वरूपी काम करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. दिनांक ३१ मे २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आहे. या जयंती उत्सवापूर्वी पुतळ्याची पुनर्चना आणि परिसराचे मजबुतीकरण व सुशोभिकरण करण्यात यावे, अशी समस्त धनगर समाज बांधव आणि महिला भगिनींची तीव्र भावना आहे. तरी बीड नगर पालिका प्रशासनाने या गंभीर बाबीची त्वरित दखल घेऊन जयंतीच्या आत हे काम कायमस्वरूपी पूर्ण करून द्यावे. अशी मागणी महाराष्ट्र धनगर महासंघ व महाराष्ट्र धनगर समाज अहिल्या आघाडीच्या प्रदेश सचिव मिनाक्षीताई देवकते-डोमाळे यांनी केली आहे.

## जामखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी यांनी पूर्ण केली 'स्व-गणना

जामखेड। प्रतिनिधी

देशाच्या प्रगतीसाठी आणि नियोजित विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'जनगणना २०२७' या राष्ट्रीय मोहिमेत जामखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. प्रांजल अमित चिंतामणी यांनी स्वतः सहभागी होऊन एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नगराध्यक्षांनी अधिकृत पोर्टलवर आपली 'स्व-गणना' प्रक्रिया पूर्ण केली असून, या उपक्रमाद्वारे त्यांनी जामखेडच्या नागरिकांसमोर एक आदर्श ठेवला आहे. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ. चिंतामणी यांनी स्पष्ट केले की, ''जनगणनेतूनच 'जनकल्याण' साध्य करता येते. आपली माहिती अचूक नोंदवणे हे केवळ शासकीय कर्तव्य नसून ते एक सामाजिक उत्तरदायित्व आहे. याच माहितीच्या आधारे भविष्यातील विकासकामे आणि योजना आखल्या जातात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा.''

यावेळी जामखेड नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा चार्ज अधिकारी यांनी शहराच्या जनगणनेच्या तयारीची माहिती दिली आणि जनगणना कार्याच्या अचूक आणि परिपूर्ण माहितीसाठी नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर आपल्या कुटुंबाची माहिती अचूक भरावी, स्व-गणना पूर्ण केल्यानंतर मिळणारा 'स्व-गणना आयडी' काळजीपूर्वक जतन करून, जेव्हा शासननियुक्त प्रगणक आपल्या घरी माहिती पडताळणीसाठी येतील, तेव्हा त्यांना आपला हा 'स्व-गणना आयडी' त्वरित उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून जनगणना प्रक्रिया अधिक जलद आणि पारदर्शक होईल अशी माहिती दिली. जामखेड नगरपरिषद प्रशासनाने शहरातील सर्व नागरिकांना या राष्ट्रीय कार्यात पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## तालुका पुरवठा निरीक्षक प्रकाश जाधव यांची चौकशी करून बदली करा!

जालना । प्रतिनिधी

जालना येथील तालुका पुरवठा निरीक्षक प्रकाश जाधव यांच्या मनमानी कारभारामुळे गोरगरीब नागरीक त्रस्त आहे. प्रकाश जाधव यांची चौकशी करून, त्यांची बदली करावी अशी मागणी बाबासाहेब वानखेडे यांनी केली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी जालना यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, जालना येथील पुरवठा विभागात निरीक्षक म्हणून प्रकाश जाधव कार्यरत आहे. प्रकाश जाधव हा व्यक्ती गोरगरीब नागरिकांना उध्दट भाषा बोलतो. व कोणत्याही तक्रारीचे निरसन करण्याऐवजी टाळाटाळ करतो. रेशन कार्डवर ऑनलाईन प्रिंटवर पुरवठा निरीक्षक अधिकारी प्रकाश जाधव यांची सही आवश्यक असते. पुर्वी हे अधिकार दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे होते. परंतू सदरील अधिकारी प्रकाश जाधव यांनी स्वतःकडे घेतले आहे. प्रकाश जाधव हे कार्यालयात थांबत नाही. व नागरीकांना जाणुन बुजून त्रास देत आहे. त्यांच्या मनमानी कारभारामुळे रेशन दुकानातून एका कार्डवर ५ व्यक्ती असतांना त्यांना पी.एच.मध्ये २५ किलो धान्य मिळायला हवे. परंतू त्यांना धान्य १५-२० किलो देण्यात येत आहे. त्यांच्या धान्यामध्ये ५ ते १० किलोची कमी दिल्या जाते. अंत्योदयमध्ये ३५ किलो, विधवा अंध, अपंग , प्रदीर्घ आजार, घटस्फोटीत महिला यांना या योजेनतून ३५ किलो धान्य मिळायला पाहिजे परंतू त्यांना २५ ते ३० किलो धान्य मिळते. याबाबत त्यांना ५ ते १० किलो धान्य कमी मिळते. त्याबाबत अनेक नागरिकांनी तक्रारी करून सुध्दा न्याय मिळत नाही. पुरवठा निरीक्षक प्रकाश जाधव यांचे रेशन दुकानदाराशी साटेलोटे असल्याची शक्यता असून, सामान्य नागरिकांना न्याय मिळत नाही. तसेच रेशन दुकानदार हे शासनाने ठरवून दिलेल्या वेळेवर दुकान उघडत नाही. नागरीक रेशनसाठी चकरा मारतात. प्रकाश जाधव हा पुरवठा निरीक्षक यापुर्वी सुरक्षा दलात होता. तरी जिल्हाधिकारी जालना यांनी पुरवठा निरीक्षक प्रकाश जाधव यांची चौकशी करावी जनकल्याण व मानवतेसाठी अशा उध्दट भाषा वापरणाऱ्या अधिकाऱ्याची इतरत्र बदली करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगनराव भुजबळ, जिल्हा पोलिस अधिक्षक जालना, पोलिस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनाही निवेदन दिले आहे.

# जिरवा जिरवीच्या राजकारणात खा.निलेश लंके यांनी नगर दक्षिण मतदार संघाची पुरती जिरवली?

## विखे विरुद्ध लंके राजकारणात अहिल्यानगर दक्षिण मतदार संघ ठेवला बेवारस?

पाथर्डी । प्रतिनिधी

महाराष्ट्रात २०२४ ला लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आहिल्या नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात भाजपचे डॉ.सुजय विखे पाटील विरुद्ध राष्ट्रवादी शरद पवार गटाचे निलेश लंके अशी थेट लढत झाली २०१९ च्या १७ व्या लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदा अहिल्यानगर दक्षिण मतदार संघाचे प्रतिनिधित्व डॉ.सुजय विखे पाटील यांनी केले २०२४ ला मात्र पहिल्यांदाच लोकसभेच्या रिंगणात उतरलेले निलेश लंके यांनी सुजय विखे पाटील यांचा निसटता पराभव केला २०२४ निवडणूक निकालानंतर दोन वर्ष उलटून गेले तरी मात्र अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार निलेश लंके यांनी एकही रुपयांचा विकासनिधी किंबहुना विकास काम / प्रकल्प केल्याचे पहावयास किंवा ऐकवयास मिळत नाही सध्या निलेश लंके यांचे एक वादग्रस्त विधान चर्चेत आहे ते म्हणजे कोणाची तरी जिरवायची होती म्हणून मी लोकसभा निवडणूक लढवली म्हणजे याचा अर्थ जिरवा जिरवीच्या राजकारणात नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघ भकास करण्याचे धोरण खा.निलेश लंके यांचे होते काय असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

२०२९ साठी अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढवायची नाही असे अप्रत्यक्ष सुतवाच निलेश लंके करता आहेत का अशीही चर्चा आहे आता अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघ सोडून पारनेर विधानसभा मतदारसंघावर लक्ष केंद्रित करणार आहे व आपली मुंबई बरी असे म्हणत निलेश लंके यांनी पुन्हा एकदा विधानसभा लढवणार असल्याचे सांगून टाकले परंतु तुमच्या टाइमपास नौटंकी व स्टंटबाजीच्या राजकारणापायी पाच वर्ष अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाच्या विकासाच्या प्रकल्पांना व विकास कामांना निलेश लंके यांच्यामुळे खीळ बसली हे नाकारता येणार नाही केवळ पान टपऱ्याचे कापड दुकान जागरण गोंधळ लग्नसमारंभ व वाढदिवस असे खाजगी कार्यक्रमांना भेटी देऊन आपल्या कार्यकर्त्यांच्या इच्छा पूर्ण करणे म्हणजे मतदार संघाचा विकास करणे नव्हे पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर पत्रकारांना धमकावणे जे लोकशाहीमध्ये प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाहीत मतदार संघातील लाखो मतदारांचा अवमान करून विकास काम करू शकत नाहीत असा निष्क्रिय लोकप्रतिनिधी मिळाल्याची खंत मतदारसंघात आता मतदार करत आहेत याउलट माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील हे सुद्धा त्यांच्या व्हीआयपी कल्चर व व्हीआयपी राजकारणाच्या धोरणामुळे पराभूत झाले हे ही तितकेच खरे आहे मतदारांना किंवा कार्यकर्त्यांना त्यांच्यात रमणारा त्यांचे प्रश्न समजून घेणारा व अडचणी सोडवणारा लोकप्रतिनिधी हवा असतो हे फार उशिरा डॉ.सुजय विखे पाटील यांच्या लक्षात आले तोपर्यंत वेळ निघून गेली होती परंतु वस्तुस्थिती अशी आहे की अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात नेहमी स्थानिक लोकप्रतिनिधीपेक्षा बाहेरच्या लोकप्रतिनिधींनी या मतदारसंघावर अतिक्रमण केल्याचा इतिहास आहे यामुळे आजतायगत अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात मोठे विकासाचे प्रकल्प येऊ शकले नाहीत किंबहुना मतदारसंघाचा विकास होऊ शकला नाही राजकारण आणि निवडणुका कोणासाठी थांबणार नाही खा.निलेश लंके यांनी जिरवा जिरवीच्या राजकारणासाठी अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदार संघ गहाण ठेवला हे मात्र सत्य नाकारता येणार नाही केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एनडीएचे सरकार आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे महाविकास आघाडीचे प्रतिनिधी असणारे खा.निलेश लंके यांचे कार्यकर्ते म्हणणार की सरकार नसल्याने विकास निधी कुठून आणणार कसा विकास करणार परंतु लोकसभा निवडणूक लढवताना मतदारसंघातील जनतेने तुम्हाला सरकार कोणाचे आहे यामुळे निवडून दिले नाही तर अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील रखडलेले प्रकल्प पाणी आरोग्य रस्ते आणि विविध उद्योगशील प्रकल्प मतदारसंघात उभारून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणे एक प्रतिनिधी म्हणून सरकारकडे पाठपुरावा करणे हे तुमचे कर्तव्य आहे परंतु तुम्ही फक्त सरकार आमचे नाही म्हणून जप करणार आणि आपल्या अपयशाचे खापर सरकारवर फोडणार हे नित्याचेच असूदे येणारा काळ याचे निश्चित अपेक्षित उत्तर मतदार संघातील मायबाप जनता घेतल्याशिवाय राहणार नाही कोण कोणाची जिरवतो ते.

# कौटुंबिक कलहातून पतीचा काटा काढला

## आठ महिन्यांपूर्वीचा खून गेवराई पोलिसांकडून उघड

गेवराई । प्रतिनिधी

पतीकडून होणाऱ्या सततच्या त्रासाला कंटाळून पत्नीने स्वतःची बहीण आणि मेहुण्याच्या मदतीने पतीचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, हा खून आठ महिन्यांपूर्वी झाला असून आरोपींनी मृतदेह आणि दुचाकी पुलावरून गोदावरी नदीत फेकून दिली होती. गेवराई पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावत पत्नीसह तीन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

पुणे येथील रहिवासी उद्धव तुकाराम शिंदे (वय ५०) आणि त्यांची पत्नी संगीता शिंदे हे ३ सप्टेंबर २०२५ रोजी गेवराई तालुक्यातील पांढरवाडी फाटा येथील आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी



आले होते. उद्धव शिंदे हे पत्नीला नेहमी त्रास देऊन मारहाण करत असत. ६ सप्टेंबर रोजी पुन्हा त्यांच्यात वाद झाला आणि हा वाद विकोपाला गेल्याने संगीता शिंदे हिने आपली बहीण सविता विष्णू वाजे आणि मेहुणा विष्णू कोंडीबा वाजे यांच्या मदतीने उद्धव यांचा गळा आवळून खून केला.

खून केल्यानंतर आरोपींनी दोन अल्पवयीन मुलांच्या मदतीने मृतदेह जवळच्या उसाच्या शेतात लपवून ठेवला. दोन-तीन दिवसांनी मृतदेहाचा वास येऊ लागल्याने, पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह गोणीत भरून शहागड येथील जुन्या पुलावरून गोदावरी नदीत फेकून दिला. त्यानंतर दोन दिवसांनी मृतकाची मोटारसायकलही नदीपात्रात टाकून दिली. आपले बिंग फुटू नये म्हणून मुख्य आरोपी संगीता शिंदे हिने पुणे येथील सिंहगड पोलीस ठाण्यात पती हरवल्याची (मिसिंग) तक्रारही दाखल केली होती.

मयत उद्धव शिंदे यांचा मुलगा शुभम याला आपल्या वडिलांच्या बाबतीत काहीतरी अघटीत घडल्याचा संशय होता. तो २ मे २०२६ रोजी पुणे पोलिसांच्या एका अंमलदारासह गेवराई पोलीस ठाण्यात दाखल झाला. पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी तात्काळ पांढरवाडी येथून विष्णू वाजे आणि सविता वाजे यांना ताब्यात घेतले. सुरुवातीला ◀◀ पान ३ वर

# उखंडा येथे तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीकडून पाणपोईचे लोकार्पण

पाटोदा । प्रतिनिधी

प्रखर उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, बीड यांच्या वतीने उखंडा/लिंबा देवी येथे पाणपोई सुरू करण्यात आली. या पाणपोईचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ड. प्रकाश दादा कवठेकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करून पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी बोलताना ड. प्रकाश दादा कवठेकर यांनी सांगितले की, उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवत असताना सर्वसामान्य नागरिक, प्रवासी व शेतकरी बांधवांना शुद्ध व थंड पिण्याचे पाणी मिळावे, हा संस्थेचा



उद्देश आहे. सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांची अंमलबजावणी पुढेही सुरू राहील.

या प्रसंगी संस्थेचे सचिव रामदास ठोसर, संचालक शिवाजीराव लोखंडे, बाबुराव कदम, नवनाथ डोळस यांच्यासह आकाश झूनगुरे, बलभीम लोखंडे, त्रिंबक ढोरे, सुखदेव गायकवाड, सखाराम लोखंडे, लिंबाजी भोंडवे, बाबू झूनगुरे, किरण लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच परिसरातील ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने हजेरी लावली.

ही पाणपोई उखंडा व लिंबा देवी परिसरातील नागरिकांसाठी तसेच रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. विशेषतः शेतकरी व कामगार वर्गाला उन्हाळ्यात मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमाबद्दल तेजस अर्बन सोसायटीच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, संस्थेने सामाजिक उपक्रमात पुढाकार घेतल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

# शौर्य जाधवची १७ वर्षांखालील SGFI राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

बीड । प्रतिनिधी

श्री गणेश विद्यामंदिर स्कूल व आदर्श क्रिकेट अकॅडमीचा होतकरू क्रिकेटपटू शौर्य शैलेश जाधव याची शालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी (डत्र्क्ष्ख) महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातून तसेच बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत शौर्यने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये अवघ्या १५ वर्षांचा शौर्य हा सर्वात लहान खेळाडू ठरला आहे.



शौर्य हा उत्कृष्ट ऑलराउंडर असून उजव्या हाताने फलंदाजी तसेच लेग स्पिन गोलंदाजीमध्ये त्याने अनेक सामन्यांत प्रभावी कामगिरी केली आहे. जिल्हास्तरीय उपांत्य (डशाळ ऋळपरश्र) सामन्यात त्याने केवळ १७ चेंडूत नाबाद ५१ धावांची तुफानी खेळी करत आपल्या संघाला विजय मिळवून देत आपली क्षमता सिद्ध केली होती.

शौर्यचा क्रिकेट प्रवास टप्प्याटप्प्याने घडत गेला. सुरुवातीला तालुकास्तरीय सामने बीड येथे पार पडले. त्यानंतर अंबेजोगाई येथे जिल्हास्तरीय निवड चाचणी झाली. पुढे परभणी जिल्ह्यातील सेलू येथे विभागीय निवड प्रक्रिया पार पडली. या सर्व टप्प्यांमध्ये सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरी करत शौर्यची छत्रपती संभाजीनगर विभागातून निवड झाली.

यानंतर अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे, बालेवाडी क्रीडा आयुक्त व निवड समितीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र संघाची अंतिम निवड करण्यात आली. या प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगर विभागातून एकट्या शौर्यचीच निवड होणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब ठरली.

निवड झालेल्या खेळाडूंचा सराव शिबिर लातूर जिल्ह्यात पार पडला असून, ◀◀ पान ३ वर

# एसआयटी चौकशी सुरू,पण कारवाई मात्र शून्य! सिद्धेश्वर विद्यालय प्रकरणात प्रशासनास सवाल?

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री सिद्धेश्वर माध्यमिक व प्राथमिक विद्यालयावरील गंभीर गैरव्यवहार प्रकरणात विशेष चौकशी पथक (एस.आय.टी.) मार्फत चौकशी सुरू असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. लाखोंची अवैध वसुली, पालकांची फसवणूक, शिक्षण हक्क कायद्याचा भंग आणि प्रशासनाच्या



निष्क्रियतेमुळे हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे.

शंभर टक्के अनुदानित असलेल्या या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेश, परीक्षा व इतर कारणांसाठी पालकांकडून ५ हजार ते १५ हजार रुपये उकळले जात असल्याचे आरोप अनेक वर्षांपासून होत आहेत. याबाबत वेळोवेळी गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद शिक्षण विभाग तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांनी कारवाई न केल्याचा गंभीर आरोप अर्जदारांनी केला आहे.

◀◀ पान ३ वर

# निस्वार्थ सेवा आणि सामाजिक बांधिलकीमुळेच तुलसीला यश मिळाले; पुज्य भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो यांचे प्रतिपादन

## तुलसी फॅशन कॉलेजच्या नूतन वास्तू व तुलसी क्रिएशन शोरूमचे दिमाखात उद्घाटन संपन्न

बीड । प्रतिनिधी

प्रा.प्रदीप रोडे यांनी निस्वार्थ सेवाभाव, नैतिकता, शील आणि सदाचार या मूल्यांच्या आधारावर उभारलेले तुलसी शैक्षणिक संकुल आज सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान ठरले आहे. केवळ पैशाने नव्हे, तर समाजासाठी वेळ, बुद्धी आणि संपत्ती खर्च केल्यानेच खरे यश प्राप्त होते. प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या कार्यातून हाच आदर्श समाजासमोर उभा केला आहे, असे प्रतिपादन पुज्य भदंत डॉ. उपगुप्त



महाथेरो यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या नूतन इमारतीचे तसेच तुलसी क्रिएशन द कम्प्लीट वुमन्स ड्रीम वर्ल्ड या शोरूमचे उद्घाटन रविवारी (दि. ३ मे) मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी ते मुख्य उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचा प्रारंभ पूज्यनीय भिक्खू संघाच्या मंगल मैत्रीत आणि बुद्धवंदनेने झाला. यावेळी पुज्य भदंत करुणानंद महाथेरो आणि पुज्य भदंत धम्मशील थेरो यांनी मंगल आशीर्वाद दिले. या ऐतिहासिक सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा.रवींद्र जोगदंड, मा.दीपक कदम, मा.डॉ. सिद्धार्थ जोंधळे, मा.सुरेश लोंढे, मा.सुदिन गायकवाड, मा.सुधाकर बनटे, मा.संदीप उपरे, मा.पी.टी .मुने, मा.रविंद्र कोलप, मा.दीपा रोडे तसेच प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांच्यासह अनेक प्रशासकीय अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना पुज्य भदंत करुणानंद महाथेरो ◀◀ पान ३ वर

# महावितरणच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांच्या म्हशीचा बळी गेला

आष्टी । प्रतिनिधी



तालुक्यातील किन्ही गावांमध्ये शेतकरी प्रवीण काकडे यांच्या शेताशेजारील एम एस सी बी ची मेन स्टेट लाईनच्या तारा एवढ्या खाली लोमकवलेल्या होत्या की अवघ्या पाच फुटावर सारी खाली लोळत होत्या या मेन तारीख च्या विद्युत प्रवाह खाली म्हैस गेल्याने तिचा शॉक लागून जागीच मृत्यू झाला ही घटना केवळ महावितरणच्या वायरमन चा निष्काळजीपणामुळे व त्या भागातील अधिकाऱ्याचे त्या ठिकाणी लक्ष नसल्यामुळे झाल्याची भावना शेतकरी प्रवीण काकडे यांनी व्यक्त केले जवळपास एक लाखाच्या किमतीची पुढची म्हैस असल्याचे त्यांनी सांगितले तरी संबंधित वायरमन व त्या भागातील अधिकाऱ्याकडून माझ्या म्हशीची नुकसान भरपाई मला मिळून द्यावी अशी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे मी मागणी करणार असल्याचे प्रवीण काकडे यांनी सांगितले.

# घाटनांदुर येथील इंडियन ऑइल पेट्रोल पंपावर कृत्रिम टंचाई दाखवून नागरिकांची हेळसांड सुरू

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील व परळी मतदारसंघातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेले घाटनांदुर येथील इंडियन ऑइल पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्याकडून कृत्रिम टंचाई दाखवून मर्जीतील व्यक्तींना पेट्रोल व डिझेल विक्री करत असल्याचे नागरिकातून बोलले जात आहे एकीकडे इराण व अमेरिकेचे युद्ध सुरू असल्याने पेट्रोल व डिझेलचे टंचाई होत असल्याचे बोलले जात आहे परंतु या युद्धाचाच सहारा घेत पंपावर




पेट्रोल व डिझेल साठा असतानाही पेट्रोल पंप चालकांनी याचा गैरफायदा घेत पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेल मुबलक साठा असूनही कृत्रिम टंचाई दाखवत असल्याचे घाटनांदुर येथील इंडियन ऑइल पेट्रोल पंप या ठिकाणी कर्मचाऱ्याकडून

# माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या गुणवंतांचा सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि.०१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते भारतीय राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेत आयोजित केलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेतील प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांक आलेल्या गुणवंत विद्यार्थी व इयत्ता-५ वी ते ९ वी व ११ वीचा निकाल जाहीर करून प्रत्येक वर्गातून गुण अनुक्रमे प्रथम, द्वितीय,तृतीय क्रमांक आल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख मान्यवर म्हणून विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई के.आंधळे / डोईफोडे मॅडम,प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलच्या प्रिन्सिपल सौ.शितल लाटणे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर, पर्यवेक्षक धाईतिडक सर,अर्थ विभाग प्रमुख श्री.डोईफोडे सर, परीक्षा विभाग प्रमुख सुनीलजी कुलकर्णी सर अदीजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.श्री.ज्ञानेश्वरीजी कनके सर यांनी त्यांच्या गोड आवाजात तुमची आमची शाळा महाराणी ताराबाई हे गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली इयत्ता- ०८ वी एनएमएमएस- २०२५-२६ परीक्षेत चि.साई ज्योतीराम टिपरे याने १५७ विक्रमी गुण घेऊन शिष्यवृत्ती पात्र झाला तसेच,कु.वरवडे समृद्धी विठ्ठल,कु.भागवत नारायणी गणेश,कु.रोकडे श्रावणी भारत,चि.टिपरे शुभम सुभाष ,चि.राठोड सुरज अंकुश,चि.राठोड युवराज अनिल हे ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत सर्वांना मिळून पुढील चार वर्षांसाठी ३३६००० रुपये मिळणार आहेत तसेच माजी आमदार केशवराव आंधळे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षात प्राथमिक गटातून कु.आळणे देहू,कु. खाडे असावरी,चि.कागणे कृष्णा तसेच माध्यमिक गटातून चि.डिगुळे सुरज,कु.भालेराव ईश्वरी,चि.चव्हाण सिद्धार्थ या विद्यार्थ्यांना शाल,स्मृतीचिन्ह रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ताराबाई सानप यांचे निधन

पाटोदा । प्रतिनिधी

खडकवाडी तालुका पाटोदा येथील श्रीमती गयाबाई माणिकराव सानप यांचे शनिवारी ०२ मे रोजी रात्री ११ वाजता दुःखद निधन झाले. मृत्यू समय त्यांचं वय ८४ होतं त्यांच्या पार्थिवावर रविवार दिनांक ०३ मे २०२६ रोजी ११ वाजता निरगुडी येथील पळसाचे शेत या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले. जुन्या पिढीतील एक कष्टाळू व मनमिळावू अशी ख्याती त्यांची परिसरात होती. त्यांच्या पश्चात २मुली,२मुलं, नातवंड पतरूंड आहेत बीड येथील शिक्षक नेते व सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे मार्गदर्शक डीजे तांदळे यांच्या त्या सासू होत्या. महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त संघटनेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



# मौलानी बाबा यात्रेत दुसऱ्या दिवशी जंगी कुस्तीचा सामना; ३ लाखांची मानाची कुस्ती ठरली आकर्षण

आष्टी (प्रतिनिधी) : आष्टी तालुक्यातील कडा येथील प्रसिद्ध मौलानी बाबा यात्रा उत्सवात दुसऱ्या दिवशी पार पडलेल्या जंगी कुस्तीच्या हगाम्याने कुस्तीप्रेमींना अक्षरशः वेड लावले. शेवटची आणि मानाची कुस्ती ही तब्बल रुपये ३ लाखांच्या बक्षिसाची ठेवण्यात आली होती. मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी ही रक्कम जाहीर केल्याने या कुस्तीची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

या वेळी माजी आमदार तथा शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजानभाई तांबोळी, सरपंच युवराज पाटील, हेमंत शेठ पोखरणा, उपसरपंच



दीपक भाऊ, मधुकर कर्डिले, योगेश शेठ भंडारी, बिपिन शेठ भंडारी, अन्ना नाथ, सरपंच संदीप खकाळ, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब थोरवे, माजी सरपंच राम मधुरकर, अनिल तात्या ढोबळे, बबलू तांबोळी, ग्रामपंचायत सदस्य शिवराज पाटील, जमीर सर, मुस्ताक पानसरे तसेच मुंबईत स्थायिक उद्योगपती दळवी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

मानाच्या कुस्तीत डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर या नामांकित मल्लाने आपल्या दमदार खेळीने प्रेक्षकांची मने जिंकली. प्रतिस्पर्ध्याला चितपट करत अक्षरशः आसमान दाखवत त्याने ही कुस्ती आपल्या नावावर केली. या लढतीने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. या कुस्ती सोहळ्यासाठी केवळ आष्टी तालुकाच नव्हे, तर शेजारील जिल्ह्यांतूनही मोठ्या संख्येने कुस्तीप्रेमींनी हजेरी लावली होती. मैदानावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महिला वर्ग, आजी-माजी मल्ल, तसेच युवक-युवतींची मोठी उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. यावेळी पत्रकार विनोद ढोबळे, शरद रेडेकर, प्रवीण पोकळे, रघुनाथ कर्डिले, अजित दादा मुळे, सचिन काळे आदी उपस्थित होते.कडा येथील मौलानी बाबा यात्रा उत्सवातील हा कुस्तीचा हगामा यंदाही भव्य-दिव्य ठरत कुस्ती परंपरेचा मान उंचावणारा ठरला.

# वैद्यनाथ बँकेच्या प्रगतीचा ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडून आढावा

## बँकेच्या आर्थिक कामगिरीचे केले कौतुक; एनपीए शुन्य टक्के तर एकूण नफा ८ कोटी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रेरणेने मराठवाड्यातील अग्रगण्य बँक असलेल्या दि. वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या कामकाजाचा व आर्थिक प्रगतीचा राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा बँकेच्या ना. पंकजाताई मुंडे यांनी आज बँकेची मार्गदर्शक या नात्याने आढावा घेतला. बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हा चेअरमन रमेश कराड व संचालक मंडळ व अधिका-यांनी यहबँकेच्या आर्थिक स्थितीबाबत सविस्तर माहिती सादर केली. ३१ मार्च २०२६ रोजी अखेर बँकेच्या ठेवी ६९६ कोटी असून एकूण कर्ज ४६५ कोटी, गुंतवणूक ३९६ कोटी, सी.आर.ए.आर. १८.१७ टक्के, निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के, एकूण नफा ८.०१ कोटी व निव्वळ नफा ४.०४ कोटी इतका आहे.

बँकेच्या प्रगतीचे कौतुक



ना. पंकजाताई मुंडे यांनी बँकेच्या आर्थिक कामगिरीचे कौतुक करत, बँकेने वित्तीय शिस्त राखत प्रगती साधल्याचे नमूद केले. तसेच बँकेचे निव्वळ एन.पी.ए. शून्य टक्के केल्याने संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच यापुढे अजून एन.पी.ए. कमी करणे, कर्जवाटपावर प्रभावी नियंत्रण ठेवणे, ग्राहकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्याबाबत तसेच मोबाईल बँकिंग, यु.पी.आय. अशा सेवा तत्पर सुरु करणेबाबत मार्गदर्शन केले.

बँकेचे संचालक व अधिकारी यांनी बँकेची आर्थिक स्थिती अधिक मजबूत करण्यासाठी, पारदर्शकता वाढविण्यासाठी व ग्राहकांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवण्याचा विश्वास व्यक्त केला. बँकेच्या मार्गदर्शक ना. पंकजाताई मुंडे, संचालिका व माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँक भविष्यात आणखी प्रगतीपथावर नेऊ असे आश्वासन दिले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार दि.४ मे २०२६ । पान ७

# मुंबई-पुणे मिसिंग लिंकवर सेल्फी-फोटो काढणं महागात पडणार, थांबलात तर गुन्हा दाखल, पोलिसांकडून कारवाईला सुरुवात

पुणे । प्रतिनिधी

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' सुरू झाल्यानंतर काही प्रवासी सेल्फी आणि फोटो काढण्यासाठी वाहनं थांबवत असल्याचं समोर आलं आहे. मात्र हा प्रकार आता प्रवाशांना महागात पडणार असून महामार्ग पोलिसांनी यावर कठोर कारवाई सुरू केली आहे. मिसिंग लिंकवर फोटो किंवा सेल्फीसाठी थांबल्यास प्रवाशांना आर्थिक दंड लागू शकतो, तसेच त्यांच्यावर गुन्हाही दाखल होऊ शकतो. त्यामुळे तुम्हाला या कारवाईला सामोरं जायचं नसेल तर मिसिंग लिंकवरुन न थांबता सुखकर प्रवास करावा, असं आवाहन महामार्ग पोलिसांनी केलं आहे.

मिसिंग लिंकवर वाहनं १०० ते १२० किमी प्रतितास वेगाने धावत असतात. अशा परिस्थितीत मध्येच थांबून फोटो काढणं हे अत्यंत धोकादायक ठरत आहे. त्यामुळेच पोलिसांनी अशा प्रकारांवर बंदी घालत दंडात्मक कारवाईला सुरुवात केली



आहे.मिसिंग लिंक हा प्रकल्प विशेषत: घाटातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी उभारण्यात आला आहे. अशा ठिकाणी वाहन थांबवणं म्हणजे स्वत:चा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणं ठरत आहे. महामार्ग पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे मिसिंग लिंकवर थांबून सेल्फी किंवा फोटो काढणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल केला जाईल.पोलिसांकडून केवळ दंडच नव्हे तर गंभीर प्रकरणांमध्ये गुन्हेही नोंदवले जाणार आहेत. सकाळपासून अशा घटनांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. कारवाई टाळायची असेल तर मिसिंग लिंकवर कुठेही न थांबता प्रवास करा, असं आवाहन महामार्ग पोलिसांनी केलं आहे.द्रुतगती मार्गावरील हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प अलीकडेच सुरू झाला आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वळणं आणि कोंडी टाळून प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी झाला आहे. १ मे रोजी, महाराष्ट्र दिनाच्या निमित्त या प्रकल्पाचं उद्घाटन करण्यात आलं. सुरुवातीला एक मार्ग सुरू करण्यात आला होता, तर आता दोन्ही बाजूंची वाहतूक सुरू झाली आहे.मिसिंग लिंक सुरू झाल्यापासून वाहतूक कोंडी आणि अपघातांमध्ये लक्षणीय घट झाल्याचा दावा यंत्रणांनी केला आहे. पूर्वी दररोज १० ते १५ अपघात किंवा कोंडीबाबत कॉल येत होते, मात्र आता एकही कॉल नियंत्रण कक्षाला आलेला नाही.

दरम्यान, भाजपचे नेते केशव उपाध्ये यांनीही मिसिंग लिंकवर फोटो काढल्याची चर्चा रंगली आहे. सोशल मीडियावर त्यांनी पोस्ट शेअर करत प्रकल्पाचं कौतुक केलं, मात्र यावरून वाहतूक नियमांच्या पालनाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# पुण्यात खळबळ; धायरीत सासऱ्याने केला सुनेचा खून

पुणे/धायरी: कौटुंबिक वादातून सासऱ्याने सुनेचा खून केल्याची धक्कादायक घटना शनिवारी उघडकीस आली आहे. सुनेचे डोके भिंतीवर आपटल्यानंतर दगडाने मारहाण करून तिचा खून केला. त्यानंतर सासरा घराला कुलूप लावून पसार झाल्याचे समोर आले आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

स्वाती तेजस चौधरी (वय ३१) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी सासरा भानुदास भास्कर चौधरी (वय ५७) यांच्याविरुद्ध नांदेड सिटी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवारी (दि.०२) रायकर मळा धायरी परिसरात घडली आहे. याबाबत तेजस चौधरी यांनी फिर्याद दिली आहे. चौधरी कुटुंबीय मूळचे जळगाव येथील राहणारे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वाती चौधरी यांचे पती तेजस चौधरी हे शिवाजीनगर न्यायालयात क्लर्क म्हणून कार्यरत आहेत. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास ते न्यायालयात गेले होते. त्यामुळे घरी सहा महिन्यांच्या बाळासह स्वाती आणि तिचे सासरे होते. स्वाती आणि त्यांचे सासरे भानुदास चौधरी यांच्यात कौटुंबिक कारणावरून वारंवार वाद होत असत. शनिवारी सकाळी साडेनऊ ते बारा वाजताच्या सुमारास त्यांच्यात पुन्हा वाद झाला.

या दरम्यान स्वाती या बाथरूममध्ये कपडे धुण्यासाठी गेल्या असताना भानुदास चौधरी तेथे गेले. त्यांनी स्वाती यांचे डोके भिंतीवर आपटले आणि कपडे धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दगडाने त्यांना मारले. त्यामध्ये स्वाती यांचा मृत्यू झाला. यानंतर आरोपीने घराला कुलूप लावून पळ काढला. तेजस यांच्या बहिणीने वहिणी स्वाती हिला फोन केला होता. मात्र, तो काही उचलला नाही. त्यानंतर तिने भावाला फोन केला. ते कोर्टात गेले होते. शेवटी तिने शेजारी राहणाऱ्या एका महिलेला फोन करून घरी काय झाले ते पाहण्यास सांगितले. त्या वेळी घरात स्वाती यांचे सहा महिन्यांचे बाळ होते. त्यांनी दरवाजा उघडून पाहिला असता हा प्रकार उघडकीस आला. यानंतर स्वाती यांचे पती तेजस चौधरी यांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी भानुदास चौधरी फरार असून, नांदेड सिटी पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

# रात्र शाळेतील विद्यार्थ्यांचे बारावी परीक्षेत घवघवीत यश

पुणे: नोकरी करून शिक्षणाची वाट शोधणाऱ्या रात्र प्रशालेतील विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. पूना नाईट हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय आणि आबासाहेब अत्रे रात्र प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेहनत केली तर यश मिळतेच, हे त्यांनी दाखवून दिले असून, प्रत्येकाच्या यशाने कौतुक होत आहे.

पूना नाईट हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीच्या परीक्षेचा निकाल ९२.५९ टक्के लागला आहे. महाविद्यालयात प्रीतम देशपांडे याने ७३.५० टक्के गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर, यश कुळे याने ६३.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर ६२.८३ टक्के गुण मिळवून ओमकार कदम याने तृतीय क्रमांक मिळवला आहे.



प्रीतम देशपांडे हा मूळचा सोलापूरचा असून, शिक्षण पूर्ण करण्याच्या जिद्दीने त्याने बारावीला पूना नाईट हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला आणि कुटुंबाला हातभार लावता यावा म्हणून दिवसा नोकरी करून रात्रीचे शिक्षण पूर्ण केले आणि परीक्षेत यश मिळवले आहे. यश कुळेची कहाणीही अशीच आहे. तो मूळचा कोकणचा असून, शिक्षण पूर्ण करण्यासाठी पुण्यामध्ये बहिणीसोबत राहत असून, कुटुंबाला हातभार लावण्यासाठी तो एका हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करतो आणि रात्रीच्या वेळेत त्याने शिक्षण पूर्ण केले. अभ्यासासाठी मेहनत घेऊन त्याने यश प्राप्त केले आहे. ओमकार कदम हा मेडिकल स्टोअरमध्ये काम करतो, त्यानेही शिक्षणासाठी मेहनत घेतली. आबासाहेब अत्रे रात्र प्रशाला आणि कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीच्या परीक्षेचा निकाल ७६.९२ टक्के लागला आहे. महाविद्यालयातील आकांक्षा केळकर हिने ५८ टक्के, फरिदा तांबोळी हिने ५६.८३ टक्के आणि चेतन सपकाळे याने ५६ टक्के गुण मिळवत यश मिळवले आहे.आकांक्षा हिला लग्नानंतर कुटुंबाची, मुलांच्या जबाबदारीमुळे शिक्षण घेता आले नाही. पण, तिने शिक्षणाच्या जिद्दीने पुढे अत्रे महाविद्यालयात प्रवेश घेतला, मेहनत घेतली आणि बारावीत यश मिळवले आहे.

संघर्षाला यशाची जोड

शुक्रवार पेठेत राहणाऱ्या मनीषा झुजम यांचे शिक्षण अपूर्ण राहिले. पण, मनात इच्छा होती. त्यामुळे २२ वर्षांनंतर त्यांनी पूना नाईट हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्या पुणे महापालिकेमध्ये नोकरी करतात आणि संघर्षमय जीवन जगत असताना मेहनत घेऊन त्यांनी बारावीच्या परीक्षेत ५३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात विद्यार्थिनींमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला.

# पुण्यात आयटी इंजिनिअर व महिला पोलिस अधिकाऱ्याचा परस्पर संमतीने घटस्फोट

पुणे । प्रतिनिधी

प्रेमाच्या नात्यातून विवाहबद्ध आणि उच्चशिक्षणामुळे करिअरमध्ये स्थिरस्थावर झालेल्या दाम्पत्याचा संसार अखेर अटींवरच संपुष्टात आला. आयटी क्षेत्रातील तरुण आणि महाराष्ट्र पोलिस दलातील महिला अधिकारी असलेल्या दाम्पत्याने समुपदेशनानंतर परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला.

पती-पत्नीमध्ये पुनर्मिलनाची शक्यता नसल्याचे आणि समुपदेशनानंतर सर्व वाद मिटल्याचा अर्ज वकिलांनी दिल्यानंतर न्यायालयाने 'कूलिंग पीरियड' माफ करत त्यांचा अर्ज अवघ्या एका दिवसात मंजूर केला. मृण्मयी आणि तेजस (नावे बदललेली) यांचा २०२१ साली 'लव्ह विथ रेंज' पद्धतीने विवाह झाला होता.

शालेय जीवनापासून एकमेकांची ओळख असलेल्या या दोघांची शाळेच्या गेट-टुगेदरमध्ये पुन्हा भेट झाली. त्यानंतर कुटुंबीयांच्या संमतीने ते विवाहबद्ध झाले. दरम्यान, काही काळातच दोघांमध्ये मतभेद उफाळून येऊ लागले. विचारसरणीतील तफावत, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, करिअरला प्राधान्य आणि विशेषत: मूल होण्याबाबतचे मतभेद यामुळे दोघांमध्ये वाद वाढू लागले.

कोणत्याही मुद्द्यावर एकमत होत नसल्याने नात्यात ताण निर्माण झाला. परस्परांबद्दल संशयाची भावना वाढून संवाद कमी झाला. त्यामुळे दोघांनी जानेवारी २०२३ पासून वेगळे राहण्याचा निर्णय घेतला. दरम्यानच्या काळात कुटुंबीय, मित्रमंडळीने समेटाचे प्रयत्न केले. मात्र, त्याचा परिणाम झाला नाही. अखेर, ड. संग्राम जाधव यांनी दोघांचेही समुपदेशन केले. त्यानंतर दोघांनीही परस्परसंमतीने नातेसंबंध संपवण्याचा निर्णय घेतला. घटस्फोटासाठी अर्ज दाखल करण्यापूर्वी स्त्रीधन, पोटगी, भविष्यातील कोणताही हस्तक्षेप न करणे यांसह सर्व मुद्द्यांवर स्पष्ट सहमती दिली. त्यानुसार ड. जाधव यांच्यामार्फत कौटुंबिक न्यायालयात परस्परसंमतीने घटस्फोटाचा अर्ज दाखल केला. न्यायालयाने तो मान्य करत एका तारखेमध्ये दोघांचा घटस्फोट मंजूर केला.

पती-पत्नीमध्ये पुनर्मिलनाची कोणतीही शक्यता उरलेली नसल्यास तसेच भरणपोषण, स्त्रीधन, मालमत्ता, मुलांचा ताबा अशा सर्व बाबींवर परस्परसहमती झाल्यास सहा महिन्यांचा 'कूलिंग पीरियड' अनिवार्य राहत नाही. सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. अशा परिस्थितीत विलंब केल्यास केवळ मानसिक ताण वाढतो. त्यामुळे न्यायालयाने विवेकाधिकार वापरत हा कालावधी माफ करून घटस्फोट जलदगतीने निकाली काढण्याची मागणी आम्ही केली व ती न्यायालयाने मंजूर केली.

ॲड. संग्राम जाधव, दाम्पत्यांचे वकील

# दौंडमध्ये कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेदरम्यान तरुणीचा मृत्यू; निष्काळजीपणाचा आरोप

यवत । प्रतिनिधी

कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेदरम्यान २२ वर्षीय तरुणीचा मृत्यू होणे, ही साधी चूक नसून हा सरळसरळ वैद्यकीय गुन्हाच आहे, अशा तीव शब्दांत जिल्हा परिषदेचे सदस्य तुषार थोरात यांनी खोर येथील रंजना बाबू केसकर यांच्या मृत्यू प्रकरणावर संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण दौंड तालुका हादरला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

खोर येथील रंजना केसकर या महिलेने कुटुंब नियोजनासाठी शस्त्रक्रिया केली. मात्र, उपचारांदरम्यान झालेल्या डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे त्यांना आपला जीव गमवावा लागला. या दुर्दैवी घटनेमुळे दोन लहान निरागस मुलांचे मातृछत्र हरपले असून, केसकर कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा परिषदेचे सदस्य तुषार थोरात यांनी तातडीने खोर येथे धाव घेतली. त्यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले तसेच संपूर्ण प्रकरणाचा सखोल आढावा घेतला. या वेळी त्यांनी प्रशासनावरही तीव शब्दांत टीका करीत जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली.तुषार थोरात म्हणाले की, एका २२ वर्षीय तरुणीला अशा निष्काळजीपणामुळे जीव गमवावा लागणे अत्यंत लज्जास्पद आणि संतापजनक आहे. दोन चिमुकल्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, याला जबाबदार कोण? अशा घटना वारंवार घडत असतील तर आरोग्य व्यवस्थेवर लोकांचा विश्वास कसा राहणार? दोषींना वाचविण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही.

या प्रकरणाची वरिष्ठपातळीवर सखोल चौकशी झालीच पाहिजे. संबंधित डॉक्टर आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तत्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी. पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. दरम्यान, याप्रकरणी पुणे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोमवारी अधिकृत निवेदन सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या निवेदनाद्वारे संपूर्ण घटनेची चौकशी, दोषींवर कारवाई आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली जाणार आहे.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन अध्यक्षपदी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची निवड

पुणे : महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (एमओए) च्या अध्यक्षपदी असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची एकमताने निवड करण्यात आली आहे




पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या असोसिएशनच्या विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. राज्याच्या क्रीडा क्षेत्रात मोहोळ यांच्या निवडीमुळे नवचैतन्य निर्माण झाले आहे. असोसिएशनचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने हे पद रिक्त झाले होते. या पदावर अध्यक्ष नेमणे आणि इतर विषयासाठी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये मोहोळ यांच्या नावाला सर्वानुमते सहमती मिळाली.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष असून या संघटनेच्या माध्यमातून ते महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड झाली होती. स्वर्गीय अजित पवारांच्या निधनानंतर अध्यक्षपद गेल्या तीन महिन्यापासून रिक्त होते.

# 'तुमची केस माहिती आहे का?' नसरापूर घटनेतील नराधम आरोपीचा कोर्टात संतापजनक दावा

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील नसरापूर येथील एका चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करीत तिला जीवे मारण्यात आल्याच्या घटनेने राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात ६५ वर्षीय भीमराव कांबळे या नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी पीडित चिमुरडीच्या कुटुंबासह राज्यभरातून केली जात आहे. दरम्यान आज आरोपीला कोर्टात हजर करण्यात आलं. यावेळी त्याने जो दावा केला ते पाहून अनेकांना धक्का बसला आहे.



पोलिसांनी अटक केल्यानंतर भीमराव कांबळे याने आपला गुन्हा कबुल केल्याची माहिती समोर आली होती. मात्र आता नसरापूर घटनेतील नराधम आरोपीने कोर्टात संतापजनक दावा केला आहे. न्यायालयात त्याला हजर केल्यानंतर न्यायाधीशांनी त्याला काही प्रश्न विचारले होते. त्याची उत्तरे ऐकून पोलिसही हैराण झाले आहे.

आरोपीचा कोर्टात अजब दावा...

न्यायाधीशाने विचारलेल्या प्रश्नावर आरोपी भीमराव कांबळे म्हणाले, मला किरकोळ मारामारीसाठी गोवण्यात आलं आहे. यावरुन आरोपी न्यायालयात स्वत:चा बचाव करीत असल्याचं दिसून येत आहे. न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नावर आरोपीने संतापजनक उत्तर दिलं. पुढे न्यायालयाने आरोपीला विचारलं...तुमची नेमकी काय केस आहे माहिती आहे का? यावर आरोपी म्हणाला, सर ही मारामारीची किरकोळ केस आहे. त्यात मला गोवण्यात आलं आहे, अशी माहिती सरकारी वकिलांनी दिली आहे. पोक्सोची संवेदनशील केस असल्यामुळे प्रसारमाध्यमांना कोर्टात सुनावणी दरम्यान हजर राहण्यास मनाई करण्यात आली होती.

# पवना नदीत पोहण्याचा मोह बेतला जीवावर, पुण्यातील तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

उन्हाळ्याची सुट्टी आणि रविवारचा विकेंड एन्जॉय करण्यासाठी मावळ परिसरात आलेल्या पुण्याच्या तीन तरुणांचा पवना नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पवना नदीच्या पात्रात पोहण्याचा मोह या तरुणांच्या जीवावर बेतला असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात आणि मृतांच्या मित्रपरिवारात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पुणे शहरातून प्रथमेश शिंदे, अश्विन भालेराव आणि आयान शेख हे तीन मित्र रविवारी सुट्टीनिमित्त मावळ तालुक्यातील पवना धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. सध्या राज्यासह पुणे



जिल्ह्यात उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला आहे.

याच उकाड्यापासून सुटका मिळवण्यासाठी आणि थंडाव्यासाठी हे तिघेही थूगाव परिसरातील पवना नदीच्या पात्रात पोहण्यासाठी उतरले. मात्र, नदीच्या पात्रातील पाण्याचा आणि खोलीचा अंदाज न आल्याने तिघेही एकामागून एक पाण्यात बुडू लागले. आजूबाजूला असलेल्यांच्या ही बाब लक्षात येईपर्यंत तिघेही पाण्यात दिसेनासे झाले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि लोणावळ्यातील प्रसिद्ध 'शिवदुर्ग मित्र' मंडळाच्या बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. शोधमोहीम राबवून काही तासांच्या प्रयत्नांनंतर तिन्ही तरुणांचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. मावळ आणि लोणावळा परिसरात पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मात्र, नद्या, धरणे किंवा धबधब्यांच्या ठिकाणी पाण्याचा अंदाज न घेता उतरणे धोक्याचे ठरू शकते. वाढत्या उष्णतेमुळे अनेक पर्यटक पाण्याकडे आकर्षित होतात, परंतु सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवल्याने अशा घटना घडतात. नदी पात्रात किंवा धरणात पोहताना पर्यटकांनी सावधगिरी बाळगावी आणि अपरिचित ठिकाणी पाण्यात उतरू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# चाकणमधील 'त्या' भयंकर घटनेचा पर्दाफाश पोलिसांनी ५५० किमीपर्यंतचे सीसीटीव्ही फुटेज तपासले

पुणे । प्रतिनिधी

चाकण बाजारपेठेतील श्री खिमत ज्वेलर्स या दुकानावर गॅस कटरच्या साहाय्याने दरोडा टाकून सोन्या-चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा गुन्हे शाखा युनिट-३ ने पर्दाफाश केला आहे.या कारवाईत पोलिसांनी राजस्थान आणि गुजरात येथील ४ आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ३० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हिम्मतकुमार साळवी, मुकेश साळवी, राधेशाम साळवी आणि पुखराज लौहार अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

७७ लाख २२ हजार रुपयांचे दागिने आणि रोकड चोरली




याबाबत सविस्तर वृत्त असं की,२२ एप्रिल २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास चाकण येथील श्री खिमत ज्वेलर्सचे शटर आणि लोखंडी ग्रील गॅस कटरने तोडून अज्ञात चोरट्यांनी ७७ लाख २२ हजार रुपयांचे दागिने आणि रोकड चोरली होती.याप्रकरणी भरत सुमेरमल वंजारा यांनी चाकण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.तांत्रिक तपास आणि तब्बल ५५० किमी पर्यंतच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर संशयित कार गुजरातच्या दिशेने गेल्याचे उघड झाले. त्याआधारे पोलिसांनी गुजरात आणि राजस्थानमधून हिम्मतकुमार साळवी, मुकेश साळवी,राधेशाम साळवी आणि पुखराज लौहार या चौघांना ताब्यात घेतले.

अन्य दोन आरोपी अद्यापही फरार

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.धक्कादायक बाब म्हणजे,दुकानात काम करणाऱ्या किशन रामलाल सोनी या व्यक्तीने चोरी करण्यासाठी आरोपींना चावी दिली होती आणि संपूर्ण माहिती पुरवली होती.या गुन्ह्यातील अन्य दोन आरोपी अद्यापही फरार आहेत.या गुन्ह्यात वापरलेली मारुती स्विफ्ट कार किंमत ३ लाख रु,२.९०० किलो बेन्टेक्स दागिने ,१७.८०० किलो चांदीचे दागिने आणि मूर्ती अंदाजे किंमत २७ लाख रु.असा ३०,२०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.